# ज्ञान प्रबोधिनी

(न्यास नोंदणी क्र. एफ्-२५४/पुणे)

# वार्षिक वृत्त

## सौर शके १९३०-३१ (इ. स. २००८ - ०९)

**(दि. १ एप्रिल २००८ ते दि. ३१ मार्च २००९)**


| | | |
|---|---|---|
| पत्ता | : | ज्ञान प्रबोधिनी, ५१०, सदाशिव पेठ, पुणे ४११०३० |
| दूरभाष क्र. | : | २४२ ०७ ००० फॅक्स : (९१) (२०)२४४ ९१ ८०६ |
| संकेत स्थळ | : | www.jnanaprabodhini.org ई-मेल : contact@jnanaprabodhini.org |

# ज्ञान प्रबोधिनी, पुणे

**सन्माननीय सदस्य**

| | | |
|---|---|---|
| **डॉ. वसंतराव गोवारीकर** | - | माजी कुलगुरु, पुणे विद्यापीठ |
| **श्री. अण्णा हजारे** | - | सामाजिक कार्यकर्ते |
| **डॉ. रघुनाथ माशेलकर** | - | माजी संचालक, CSIR नवी दिल्ली |
| **डॉ. जयंत नारळीकर** | - | माजी संचालक, आयुका, पुणे |
| **डॉ. होमी सेठना** | - | माजी संचालक, अणु ऊर्जा समिती, मुंबई |
| **डॉ. बी. एम्. उद्गावकर** | - | माजी शास्त्रज्ञ, TIFR मुंबई |

**पदाधिकारी** **२००८ - २००९**

| | | |
|---|---|---|
| **अध्यक्ष** | - | डॉ. वसंतराव गोवारीकर |
| **उपाध्यक्ष** | - | श्री. अण्णा हजारे |
| **कार्याध्यक्ष** | - | डॉ. प्र. ल. गावडे |
| **उपकार्याध्यक्ष** | - | डॉ. पद्माकर दुभाषी |
| **संचालक** | - | डॉ. गिरीश श्री. बापट |
| **कार्यवाह** | - | श्री. वि.शं. /सुभाष देशपांडे |
| **सहकार्यवाह** | - | श्री. वि. ध. गुर्जर |

---

## ◆ *ज्ञान प्रबोधिनी कार्यकारी मंडळ २००८-२००९* ◆

**निर्वाचित सदस्य**

१. वा. प्र. ल. गावडे
२. वा. प. रा. दुभाषी
३. वा. गि. श्री. बापट
४. प्रा. वि.शं. /सुभाष देशपांडे
५. प्रा. वि. ध. गुर्जर
६. प्रा. वा. ना. अभ्यंकर
७. वा. उषाताई खिरे
८. श्री. मोहन चि. गुजराथी
९. श्री. विवेक द. पोंक्षे
१०. वा. सुधाताई कोठारी
११. श्री. महेश आठवले
१२. वा. वि. बा. कुलकर्णी
१३. वा. स्वर्णलता भिशीकर
१४. श्री. रामकुमार राठी
१५. प्रा. महेंद्र सेठिया

**नियुक्त सदस्य**

१६. श्री. मनोज देवळेकर
१७. वा. अनघाताई लवळेकर
१८. श्री. संतोष गायकवाड
१९. श्री. विवेक गिरीधारी
२०. सौ. संगीताताई कुलकर्णी

---

- ➢ **मुख्य केंद्रे** : पुणे, निगडी, सोलापूर
- ➢ **उपकेंद्रे** : शिवापूर, वेल्हे, साळुंब्रे (पुणे जिल्हा)<br>हराळी (उस्मानाबाद जिल्हा)<br>शिरवळ (सातारा जिल्हा)
- ➢ **विस्तार केंद्रे** : अंबाजोगाई (बीड जिल्हा),<br>बोरिवली, डोंबिवली, सांगली

---

• १) ज्ञान प्रबोधिनी संशोधन संस्था २) ज्ञान प्रबोधिनी शिवप्रदेश ३) ज्ञान प्रबोधिनी सोलापूर व ४) ज्ञान प्रबोधिनी आयुर्विज्ञान संस्था या न्यासांचे वृत्तांत स्वतंत्रपणे प्रसिद्ध केले जातात.

## अनुक्रमणिका


◆ **शिक्षण प्रभाग**

ज्ञान प्रबोधिनी प्रशाला ५ - ७
छात्र प्रबोधन ८ - ९
स्पर्धा परीक्षा केंद्र १० - ११
नवनगर विद्यालय, निगडी १२ - १५

◆ **संघटन प्रभाग**

युवक विभाग १६
युवती विभाग १६
स्त्री शक्ती प्रबोधन १७ - १९
अंबाजोगाई उपकेंद्र २०
बोरिवली विस्तार केंद्र २०
डोंबिवली विस्तार केंद्र २१
सांगली विस्तार केंद्र २१
इचलकरंजी उपक्रम केंद्र २१
नागरी वस्ती अभ्यास गट २२

◆ **ग्रामविकसन प्रभाग**

पाणलोट क्षेत्र विकास २३
ग्रामीण महिलांचे बचत गट २३
जिजामाता प्रबोधन केंद्र २३
राम-सीता पुराणिक तंत्र निकेतन, शिवापूर २४
ग्रामीण आरोग्य २५
अन्य संस्थांशी साहचर्य २६
प्रशिक्षणे २७

◆ **मध्यवर्ती कार्यक्रम**

चौथा खंड प्रकाशन २८

◆ **सीमावर्ती प्रांतांमधील काम**

जम्मू-काश्मीर २८
अरुणाचल प्रदेश २८


---

# ज्ञान प्रबोधिनी

## 'समाज संस्थापनेसाठी नेतृत्व विकसन'



### संशोधन

- विविध सामाजिक व आर्थिक स्तरातील बुद्धिमत्तेच्या १२० पैलूंचा शोध व मापन
- प्रेरणा, प्रतिभा, गतिवाचन, निर्णयक्षमता तसेच सामाजिक जाणीव व गटकार्य यांवर संशोधन
- भारतीय संस्कृतीच्या जागतिक प्रभावावर संशोधन



### शिक्षण

- 'मनुष्यघडणीचे शिक्षण' या स्वामी विवेकानंदांच्या संकल्पनेचा क्रमिक शिक्षणाशी जोडलेला पथदर्शक प्रयोग
- अनौपचारिक शिक्षणाची समाजाभिमुख चळवळ
- गुरुकुल पद्धतीचे शहरात व ग्रामीण परिसरात प्रयोग



### विकास

- देशप्रश्नांच्या सोडवणुकीसाठी चारित्र्य व सक्षम नेतृत्वाची जडणघडण
- स्त्री शक्ती प्रबोधन
- नदीचे खोरे हा घटक मानून ग्रामीण विकासाचे बहुविध उपक्रम



### एकात्मता

- निवडक संस्कारविधींना कालोचित व सार्थ रूप देणाऱ्या पुस्तकांचे प्रकाशन
- सर्व जातिधर्मांतील स्त्री-पुरुषांना पौरोहित्याचे प्रशिक्षण
- राष्ट्रीय एकात्मतेची भावना वाढविण्यासाठी विभिन्न विचारसरणींमध्ये पूल बांधण्याचे प्रयत्न.



### आरोग्य

- रोगप्रतिबंधक उपायांची जाणीवजागृती
- क्रीडाकुल संकल्पनेद्वारा स्पर्धात्मक खेळांचा प्रसार
- अत्याधुनिक तंत्रज्ञान व जिव्हाळ्याचे मानवी संबंध यांवर आधारित रुग्णालये
- आयुर्वेद, योग, मानसोपचार इ. चा एकात्मिक वापर

# शिक्षण प्रभाग

## ज्ञान प्रबोधिनी प्रशाला, पुणे

### • परीक्षा निर्णय

जून २००८ मध्ये इ. १० वी चा निर्णय लागला. कु.अमृता कोंड्रा (९५.८%) व कु. नहुष गोंधळेकर (९५.२२%) यांनी प्रशालेत अनुक्रमे प्रथम, द्वितीय क्रमांक मिळविला. १६ विद्यार्थ्यांनी ९०% वर गुण मिळविले. २८ विद्यार्थ्यांना संस्कृतमध्ये १०० पैकी १०० गुण मिळाले. एकूण निर्णय सरासरी ८३.२% आहे.

राष्ट्रीय प्रज्ञा शोध परीक्षेत (२००७-०८) शिष्यवृत्तीसाठी हर्षवर्धन जोग, सौमित्र क्षीरसागर, ईशान ढेकणे, अद्वैत मठकरी, स्पृहा कुर्लेकर, केतन काटकर, अजिंक्य शेजूळ या विद्यार्थ्यांची निवड झाली.

गोवा येथे दि. २२ ते २६ ऑक्टोबर या कालावधीत २००८-०९ च्या परीक्षेसाठी प्रशिक्षण शिबिर झाले. त्याला गोव्यातील १७-१८ शाळांमधील एकूण ३५ निवडक विद्यार्थी आले होते.

पुणे जिल्हा गणित अध्यापक मंडळातर्फे आयोजित गणित प्रज्ञा परीक्षेत इ. ५वीचे २३ विद्यार्थी व इ. ८वी चे ७ विद्यार्थी निवडले गेले. यामध्ये कु. यश लेले (इ. ५वी), कु. विजय जोशी (इ. ८वी), कु. मृदुल थत्ते (इ. ८वी) यांची शिष्यवृत्तीसाठी निवड झाली. एकूण २६ जणांना गुणवत्ता प्रशस्तीपत्रक मिळाले व कु. श्रावण पाटणकर इ. ५ वी, कु. अजिंक्य शेजूळ व कु. विभा नासेरी इ. ८ वी यांना या परीक्षेची शिष्यवृत्ती मिळाली.

राष्ट्रीय गणित ऑलिम्पियाड मध्ये कु. इंद्रनील कसमळकर हा भारतात पाचवा आला व कु. ईशान ढेकणे हा नवव्या क्रमांकावर उत्तीर्ण झाला.

### • सहाध्याय दिन

दि. २९, ३० मार्च रोजी इ. ९ वी मुलींचा सहाध्याय दिन झाला. हराळी, सोलापूर येथील प्रबोधिनीचा विस्तार पाहणे व मा. आण्णांचे मार्गदर्शनपर आशीर्वाद घेणे, तसेच त्या परिसराजवळ असलेली यमगरवाडी येथील आश्रम शाळा पाहणे व तेथील पारधी मुलांशी संवाद साधणे हा उद्देश होता.

दि. १७ ते २२ ऑक्टोबर या कालावधीत इ. ५ वी ते ७ वी या वर्गातील विद्यार्थ्यांच्या राजा केळकर संग्रहालय, पर्वती-पाचगाव-तळजाई टेकडी, सिंहगड पायथा परिसरात पक्षी निरीक्षण आणि CME (College of Military Engineering) येथे भेटी झाल्या.

इ. ६ वी विद्यार्थ्यांचा सहाध्यायदिनाचा विषय 'नकाशानुरूप किल्ले बनविणे' असा होता. दि. २१ ऑक्टोबर रोजी त्यांची कार्यशाळा झाली. दि. २२ रोजी कोथरुडच्या स्मृतिवनात ४० विद्यार्थ्यांचे ७ गट गेले. ह्या गटांनी तेथे किल्ले केले.

इ. ९वी चे विद्यार्थी दि. २७ जानेवारी रोजी व विद्यार्थिनी दि. २९ जानेवारी रोजी मुंबईच्या नेहरू विज्ञान केंद्र येथे अभ्यासासाठी गेल्या होत्या.

### • कार्यक्रम, उत्सव व अनुभव

दि. २१ जून रोजी प्रशालेचा वर्षारंभ झाला. न्यू इंग्लिश स्कूल टिळक रोड (मराठी माध्यम) या शाळेचे प्राचार्य प्रा. बुरसे हे अभ्यागत म्हणून लाभले होते.

दि. २६ जून रोजी इ. १०वी च्या विद्यार्थिनी आळंदीला पालखीच्या दर्शनासाठी गेल्या होत्या. त्या रात्री वास्तव्य करून तेथून पालखीबरोबर पुण्यापर्यंत चालत आल्या. दि. २९ जून रोजी इ. ८वी व ९वी च्या विद्यार्थिनींनी हडपसर ते दिवेघाट हा पालखी बरोबर जाण्याचा अनुभव घेतला. इ. ८वी व ९वी चे विद्यार्थी युवक विभागाच्या मार्गदर्शनाखाली वेगवेगळ्या मंदिरांतून भजनासाठी गेले होते.

दि. ९ व १० जुलै रोजी अनुक्रमे इ. ९वी चे विद्यार्थी व विद्यार्थिनी पाबे या गावी शेतीमध्ये भातलावणीचा अनुभव घेण्यासाठी गेले होते.

दि. ३ सप्टेंबर ते ११ सप्टेंबर या कालावधीत गणेशोत्सवाच्या निमित्ताने छोट्या गटासाठी (इ. ५वी ते ७वी) वक्तृत्व, निबंध आणि चित्रकला स्पर्धा घेण्यात आल्या. मोठ्या गटासाठी (इ. ८ वी ते १० वी) विविध सामाजिक प्रश्नांवर व्याख्याने झाली.

सप्टेंबर महिन्यात उपासनेनंतरच्या चिंतनात श्री. दिलीप पुरोहित यांनी '१८५७ चे स्वातंत्र्यसमर व राष्ट्रवाद', श्री. ज्ञानेश पुरंदरे यांनी 'सामाजिक बांधिलकीने राष्ट्रअर्चना' व श्री. शिरीष पटवर्धन यांनी 'वारी - एक चिंतन' यावर मार्गदर्शन केले.

दि. १८ सप्टेंबर रोजी स्पिकमॅके प्रस्तुत कव्वालीचा कार्यक्रम इ. ८ वी ते १० च्या विद्यार्थ्यांसमोर झाला. जागतिक कीर्तीचे कलाकार श्री. इक्बाल हुसेन बंदनवाजी व सहकलाकार यांनी हा लोकसंगीताचा प्रकार सादर केला. या दिवशीच प्रशालेच्या इ. ८ वी व ९ वी च्या विद्यार्थ्यांसाठी विक्री कौशल्य कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती.

दि. १२ डिसेंबर रोजी क्रीडाकुल निगडी येथील इ. ५वी च्या विद्यार्थी-विद्यार्थिनींनी प्रशालेस भेट दिली.

फिलिप्स कंपनीचे माजी संशोधन प्रमुख श्री. श्रीरंग गोखले यांचे दि. १३ डिसेंबर रोजी 'संकल्प' या विषयावर इ. ९वी मुलींसमोर व्याख्यान झाले.

दि. १८ डिसेंबर रोजी ज्ञान प्रबोधिनी-सोलापूर प्रशालेतील इ. ७ वी व ८ वी च्या विद्यार्थी-विद्यार्थिनींनी व ११ शिक्षकांनी प्रशालेस भेट दिली.

दि. १० जानेवारी रोजी उपासनेनंतर श्री. विश्वासजी लापालकर यांचे दि.१२ जानेवारीच्या युवक दिनाचे निमित्त साधून 'Cyclonic Patriotic Hindu Monk of India' या विषयावर व्याख्यान झाले.

दि. ४ फेब्रुवारी रोजी भारती विद्यापीठ होमिओपथिक कॉलेज व रोटरी क्लबतर्फे आयोजित 'Know Your body' हे न्यू इंग्लिश स्कूल येथे भरविण्यात आलेले प्रदर्शन इ. ८ वी व ९वी च्या विद्यार्थी-विद्यार्थिनींनी पाहिले.

दि. ७, १४ व २८ फेब्रुवारी या तीन शनिवारी उपासनेनंतर 'नेतृत्वासाठी आवश्यक गुण - सामाजिक जाणीव' या संकल्पनेवर आधारित मा. सुवर्णाताई गोखले, मा. अनघाताई लवळेकर व मा. बागेश्रीताई पोंक्षे यांनी आपले चिंतन मांडले. बचत गटांची सुरुवात, बचत गटांचे काम, स्वतःचा विकास आणि गावाचा विकास, स्वातंत्र्याची समज या विषयांवर त्यांनी विचार मांडले.

दि. २७ फेब्रुवारी रोजी Zoological Survey of India, Kolkata चे डॉ. ए. के. हाजरा यांचे इयत्ता नववीच्या विद्यार्थी-विद्यार्थिनींसमोर 'Expedition to Antarctica' या विषयावर व्याख्यान झाले.

दि. २३ फेब्रुवारी रोजी प्रशालेतील इ. ५वी ते ९वी च्या युवतींची क्रीडा प्रात्यक्षिके झाली.

दि. १३ मार्च रोजी शैक्षणिक साधन केंद्राचे 'शैक्षणिक साधन घर'(रिसोर्स सेंटर) या संकेत स्थळाचे उद्घाटन (www.ercpune.org) मा. सुभाषराव देशपांडे यांच्या हस्ते झाले. या प्रकल्पासाठी देणगी देणारे श्री. भाल तुळपुळे व सौ. शरयू तुळपुळे या कार्यक्रमाला उपस्थित होते.

• **सहल**

दि. ३०, ३१ मार्च व १ एप्रिल या कालावधीत इ. ९ वी मुलांची कोकण अभ्यास सहल झाली. देवरुख येथील 'सुश्रुत वैद्यकीय साधने निर्मिती केंद्र' पाहणे, रत्नागिरी येथे श्री. दिलीप भटकर यांचे 'जहाज बांधणी, परिवहन व दुरुस्ती' या क्षेत्रातील अनुभव-कथन ऐकणे, कोयनानगर येथील 'जलविद्युत केंद्र' पाहणे, पुळणीवरची भौगोलिक वैशिष्ट्ये पाहणे, गणपतीपुळे येथील मंदिर, प्राचीन कोकण प्रदर्शन पाहाणे, हेदवीचे पुळण पाहणे, दाभोळची खाडी फेरी बोटीने पार करून दापोलीस जाणे, कोकण कृषी विद्यापीठाचे प्रदर्शन व श्री. दिलीप कुलकर्णी यांच्याशी गप्पा असा कार्यक्रम होता.

• **विद्याव्रत संस्कार**

इ. ८ वी विद्याव्रत संस्कार व्याख्यानमालेअंतर्गत चार व्याख्याने झाली. प्राचार्य मा. विवेकराव पोंक्षे यांनी दोन्ही वर्गांसमोर प्रास्ताविक केले. इ. ८ वी मुलांसाठी श्री. आनंद लुंकड व इ.८वी मुलींसाठी प्रा. संगीताताई कुलकर्णी यांचे 'शारीरिक विकसन' या विषयावर व्याख्यान झाले.

इ. ८वी च्या विद्यार्थिनींचा व विद्यार्थ्यांचा विद्याव्रत संस्कार समारंभ अनुक्रमे दि. १७ व १८ जानेवारी रोजी संपन्न झाला. प्रमुख अतिथी म्हणून विद्यार्थिनींकडे मा. डॉ. विनया घाटे व विद्यार्थ्यांकडे मा. श्री. मिलिंद जोशी यांनी आशीर्वाद दिले.

दि. ४ जुलै रोजी विद्याव्रताचा पाठपुरावा म्हणून मा. यशवंतरावांनी विद्याव्रत पोथीतील अनेक संकल्पना इ. ९वी च्या विद्यार्थिनींना पुन्हा समजावून सांगितल्या.

दि. २२ व २३ मार्च रोजी १९९८ व २००० साली शालांत परीक्षा दिलेल्या प्रशालेच्या विद्यार्थिनींचे सज्जनगडावर दीक्षान्त शिबिर झाले. या शिबिरात मा. यशवंतराव, मा.विवेकराव पोंक्षे, वा. विवेकराव कुलकर्णी, वा. अनघाताई, प्रा. सुवर्णाताई व विशेष मार्गदर्शन करण्यासाठी म्हणून श्री. दिलीप कुलकर्णी यांना निमंत्रित करण्यात आले होते. नोकरी व आयुष्यात घडणाऱ्या नेहमीच्या घडामोडींमध्ये हरवून न जाता काही वेगळे करायचे तर, काय आणि कसे ? या प्रत्येकीच्याच मनातल्या प्रश्नांवर सत्रांमध्ये झालेल्या चर्चांमुळे विचार सुरू झाला.

• **स्पर्धा**

शहरस्तरीय खो-खो स्पर्धेत १६ वर्षाखालील मुलांच्या गटाने उपविजेतेपद मिळविले.

जिल्हास्तरीय 'पूना गर्ल्स् स्कूल स्पोर्टस् असोसिएशन' (P.G.S.S.A) तर्फे आयोजित मैदानी स्पर्धेमध्ये प्रशालेच्या विद्यार्थिनींनी भरीव कामगिरी केली.

**मध्यम गट** : १) कु. सुयोगिनी दौंडकर (इ. ८वी) हिने गोळाफेक-सुवर्ण व थाळीफेक - रौप्य पदक मिळविले, २) कु. शर्वरी खेडकर हिने लांब उडी -सुवर्ण व उंच उडी - रौप्य पदक मिळविले.

**मोठा गट** : १) कु. तन्वी जोशी ४०० मी. धावणे - सुवर्ण पदक, २) कु. निशिगंधा खळदकर, कु. तन्वी जोशी, कु. श्रुती जातेगावकर, कु. श्रुती फडके -१०० मी. रिले स्पर्धेत कांस्य पदक मिळाले. प्रशालेस सांघिक उपविजेतेपदाचा मान मिळाला.

दै. प्रभात तर्फे आयोजित इयत्ता ९वीच्या अभ्यासक्रमावर आधारित नाट्य स्पर्धेत इ. ८वी च्या दहा विद्यार्थ्यांच्या गटाने शेतकऱ्यांच्या प्रश्नावर आधारित नाटक सादर केले. त्यामध्ये त्यांना प्रथम क्रमांक मिळाला.

रोटरी क्लब शनिवारवाडा(जागर) तर्फे आयोजित आंतरशालेय प्रसंग नाट्य प्रदर्शन स्पर्धेमध्ये प्रशालेस प्रथम क्रमांक मिळाला.

• **बाल विज्ञान चळवळ**

राष्ट्रीय बालविज्ञान शिक्षक प्रशिक्षणांतर्गत 'आपली पृथ्वी आपली वसुंधरा' या विषयावर प्रा. प्रशांत दिवेकर यांनी अनुक्रमे रत्नागिरी, शिक्रापूर व बारामती येथील शिक्षकांचे प्रशिक्षण शिबिर घेतले.

दि. ६ फेब्रुवारी रोजी बाल विज्ञान चळवळीद्वारे आयोजित प्रा. सुरेश आगरवाल यांचे इ. ९ वी च्या विद्यार्थी-विद्यार्थिनींसमोर

विज्ञान प्रयोगांचे प्रात्यक्षिक झाले. प्रा. आगरवाल यांच्या मार्गदर्शनाने दि. ७ फेब्रुवारी रोजी विज्ञान शिकविणाऱ्या अध्यापकांसाठीही एक शिबिर झाले. पुण्यातील विविध शाळांतील एकूण २५ अध्यापकांनी या शिबिराचा लाभ घेतला.

विज्ञानदिनानिमित्त आयुकातर्फे आयोजित प्रश्नमंजूषा स्पर्धेत कु. ईशान ढेकणे, कु. हर्षवर्धन जोग, कु. आदित्य जोशी या इ. ९वीच्या विद्यार्थ्यांच्या गटाने प्रथम पारितोषिक मिळविले. वैज्ञानिक निबंध स्पर्धेत कु. स्पृहा कुर्लेकरला प्रथम पारितोषिक मिळाले. सर्वसाधारण विजेतेपदाचा चषक प्रशालेस मिळाला.

होमी भाभा बाल वैज्ञानिक स्पर्धेमध्ये कु. हर्षवर्धन जोग इ.९वी, कु. संविद कुर्लेकर इ. ६वी, कु. सोहम रास्ते इ. ६वी यांना प्रत्येकी रौप्य पदक मिळाले.

दि. ११ फेब्रुवारी रोजी, चार्ल्स डार्विनच्या दोनशेव्या जयंतीनिमित्त नचिकेत नित्सुरे याने इ. ८ वी व ९ वी च्या विद्यार्थ्यांसमोर त्यांचे चरित्र सांगितले.

## • अध्यापक बैठक व शिबिर

दि. ८ एप्रिल रोजी अध्यापक बैठकीत मा. महेंद्रभाई यांनी प्रशालेतील अभिव्यक्तीच्या तासिकांना 'व्यवस्थापन कौशल्य' शिकविण्याच्या प्रयोगांविषयी आपले अनुभव मांडले.

दि. ६ व ७ जून रोजी प्रशालेतील अध्यापकांचे शिबिर झाले. अनुभवी अध्यापक व नवीन अध्यापक असे दोन वेगळे गट केले होते. नवीन अध्यापकांच्या गटात मा. सविताताईंनी - वर्ग नियंत्रण, मा. सुजलताईंनी बुद्धिमत्तेचे पैलू, मा. वनितताईंनी सर्जनशीलता या विषयांची मांडणी केली. प्रबोधिनी परिचयात सर्व विभागांची ओळख असे एक सत्र होते. अनुभवी अध्यापकांच्या गटासमोर मा. विवेक पोंक्षे यांनी 'स्वामी विवेकानंदांचे शिक्षण विचार' व मा. विसुभाऊ गुर्जर यांनी 'योगी अरविंदांचे शिक्षण विचार' या विषयांवर मांडणी केली. सौ. प्रज्ञा कुलकर्णी व प्रा. मुकुलिका थत्ते यांनी संशोधनाच्या प्रारूपाची मांडणी केली प्रा. सुचरितताई व वा. अनघाताई यांनी आपल्या संशोधनाची मांडणी केली.

## • अध्यापक सहल

दि. २ नोव्हेंबर ते ९ नोव्हेंबर या कालावधीत प्रशालेचे अध्यापक, इतर शाळेतील अध्यापक व अभ्यासू व्यक्ती अशा एकूण २२ जणांचा विदर्भात 'सेवाग्राम ते शोधग्राम' हा अभ्यासदौरा झाला. राष्ट्रीय विचारांनी प्रेरित होऊन निर्माण झालेल्या शैक्षणिक संस्था व प्रयोग पाहणे, सामाजिक संस्थांची कार्यपद्धती, संशोधन व सेवा प्रत्यक्ष पाहून समजून घेणे असा या अभ्यासदौऱ्याचा हेतू होता. वर्धा येथील सेवाग्राम, नई तालीम, पवनार आश्रम येथे भेट, शोधग्राम येथील प्रकल्पांची माहिती घेणे, डॉ. राणी बंग यांची भेट घेणे व तेथील संशोधन जाणून घेणे, आनंदवनातील कार्यकर्ते व प्रकल्प पाहणे व प्रत्यक्ष माननीय साधनाताईंशी हितगुज करणे, सोमनाथ येथील डॉ. विकास आमटेंचा 'झरी प्रकल्प' आणि हेमलकसा येथील लोकबिरादरी प्रकल्प व तेथे डॉ. प्रकाश आमटे व डॉ. मंदा आमटे यांच्याशी संवाद करणे तसेच श्री. संदीप भाजीभाकरे, श्रीमती लीना बनसोड, श्रीमती किरणताई मुसळे (कुलकर्णी) या प्रशासकीय सेवेत असणाऱ्या व्यक्तींची मुलाखत, मेंढालेखा येथील स्वायत्त गावाचे नेते श्री. देवाजी तोफा यांची मुलाखत अशा समाजाच्या उन्नतीसाठी कार्यरत व्यक्ती व त्यांच्या वेगवेगळ्या कार्यपद्धतींचा तौलनिक अभ्यास करता आला.

दि. १० ऑक्टोबर ते १२ ऑक्टोबर या कालावधीत प्रशालेतील बारा कार्यालयीन व ग्रंथालयीन कर्मचारी सदस्यांनी सोलापूर व हराळीला भेट दिली. तेथील प्रबोधिनीचे विस्तार कार्य माहिती करून घेतले.

## • अन्य संस्थांना मार्गदर्शन

दि १८ मे रोजी विवेकानंद केंद्र शिक्षा प्रसार विभाग आयोजित 'Nationalistic Education : Means to integrate it with school curriculum' या विषयावरील चर्चासत्रात मा. विवेकराव पोंक्षे यांनी 'ज्ञान प्रबोधिनी : राष्ट्रीय शिक्षणाचा अभिनव प्रयोग' या विषयावर मांडणी केली.

दि. २० ते २६ मे रोजी याच विभागातर्फे आयोजित विज्ञान प्रकल्प शिबिरात, आसामच्या ९ शाळातील १० शिक्षक व २७ विद्यार्थ्यांना मा. विवेकराव पोंक्षे व प्रा. प्रशांत दिवेकर यांनी मार्गदर्शन केले.

दि. १ ते ५ जून या कालावधीत प्रशालेत अध्यापक प्रशिक्षण शिबिर झाले. प्रकल्प पद्धती, संस्कार कार्यक्रम, बर्चीनृत्य, गुणविकास योजना असे प्रशिक्षणाचे स्वरूप होते. १४ शाळांतील ३६ अध्यापकांचा सहभाग होता.

दि. १२, १३ जून रोजी चिपळूण येथील 'शिक्षण प्रसारक' मंडळाच्या वाणिज्य महाविद्यालयातील बारावीच्या विद्यार्थ्यांचे प्रा. प्रशांत दिवेकर व प्रा. शिवाजी कोंडे यांनी स्वयं अध्ययन कौशल्यांचे प्रशिक्षण घेतले.

दि. १५ ऑगस्ट ते १८ ऑगस्ट या कालावधीत गोगटे-जोगळेकर महाविद्यालय, रत्नागिरी येथे 'रामायण' या विषयावर वा. भाग्यश्रीताई हर्षे यांनी कार्यशाळा घेतली. यामध्ये प्रथम वर्ष ते पदव्युत्तर महाविद्यालयीन विद्यार्थिनी सहभागी होत्या.

विवेकानंद केंद्र विद्यालय - खरसांग, अरुणाचल प्रदेश येथे दि. १२ ते १५ ऑक्टोबर या कालावधीत सामाजिक अध्ययन या विषयावर ५० अध्यापकांचे प्रशिक्षण शिबिर झाले. डॉ. सुरेंद्र ठाकुरदेसाई व प्रा. प्रशांत दिवेकर यांनी या शिबिरात मार्गदर्शन केले.

दि. ६ नोव्हेंबर रोजी शिवाजी शिक्षण प्रसारक संस्थेतर्फे आयोजित अध्यापक प्रशिक्षण शिबिरात प्रकल्प कार्यशाळेमध्ये वा. भाग्यश्रीताई हर्षे व प्रा. नेहाताई अभ्यंकर यांनी मार्गदर्शन केले. या शिबिरासाठी १६ शाळांमधील २०० शिक्षक सहभागी झाले होते. हे शिबिर सासवड तालुक्यातील पिंपरे या गावी झाले.

# छात्र प्रबोधन

## • प्रा. महेंद्रभाई सेठिया यांची भाषणे व दौरे

'अक्षरनंदन' शाळेतील इ. ८वी ते १०वी च्या मुलांच्या ७० पालकांसाठी 'आश्वासक पालकत्व' विषयावर छात्र प्रबोधनचे संपादक प्रा. महेंद्रभाई सेठिया यांचे व्याख्यान दि. १९ जुलैला झाले.

दि. २६ जुलै रोजी रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनीत मुंबई चतुरंग प्रतिष्ठानच्या कार्यकर्ते प्रशिक्षण शिबिरात 'वर्धिष्णु कार्यकर्ता' या विषयावर व्याख्यान झाले.

सासवड येथे वाघिरे हायस्कूल मध्ये 'विद्याव्रताचे पुस्तक' ग्रामीण भागातील मुलांना किती समजते, यासाठी इ. ८ व ९ वीच्या मुलांचे एक सत्र घेतले. त्याला ८० विद्यार्थी उपस्थित होते.

दि. १५ जानेवारी रोजी खंडेलवाल इंग्लिश स्कूल, अकोला या शाळेच्या सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त पालक सभेत प्रा. महेंद्रभाईंचे व्याख्यान झाले. जिल्हाधिकारी श्रीकर परदेशी व नितीन ओक यांची सविस्तर भेट झाली.

उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या वतीने महात्मा गांधी विद्यालयात डॉ. पंजाबराव देशमुख स्मृती व्याख्यानमालेत '२१वे शतक व ग्रामीण तरुण' या विषयावर भाषण झाले.

चाळीसगावच्या पूर्णपात्रे विद्यालयातील इ. ९ वी व १०वीच्या विद्यार्थ्यांसमोर 'करीअर निवडताना कसा व कोणता विचार करावा' यावर व्याख्यान झाले. जेम्स शेपर्ड या शाळेत इ. १०वी च्या विद्यार्थ्यांसाठी 'अभ्यास कसा करावा' या विषयी व्याख्यान झाले.

दि. ११ ऑगस्ट रोजी प्रा. महेंद्रभाईंचा रसायनी दौरा झाला. मातृभूमी पूजनाला साधारणपणे ८० लोकांची उपस्थिती होती. पूर्वीचे युवक-युवती व कार्यकर्ते उपस्थित होते. त्यानंतर १७ ते १९ युवक-युवतींची साधारण तासभराची बैठक झाली.

पनवेल येथे देवरुखे ब्राह्मण संघ व छात्र प्रबोधनचे कार्यकर्ते यांनी मिळून प्रबोधन वर्ग घेतला. त्यात महेंद्रभाईंचे व्याख्यान झाले. ७०-७५ विद्यार्थी-विद्यार्थिनी व साधारण ५० पालक वर्गाला उपस्थित होते.

## • 'छात्र प्रबोधन' मासिक / दिवाळी अंक

आषाढ महिन्याचा विद्यार्थी विशेषांक प्रसिद्ध झाला. या अंकातील लेखक, कवी, चित्रकार आणि संपादक मंडळातील विद्यार्थ्यांसाठी छोटासा कौतुक समारंभ दि. ५ जुलै रोजी झाला.

यावर्षी श्री. सतीशकाका कुलकर्णी यांनी प्रचार व वितरण यंत्रणा चांगल्या रितीने सांभाळली. विभाग संपर्क प्रमुख अशी नवीन रचना तयार करण्याचा प्रयत्न झाला. महाराष्ट्रभर १७ विभाग निश्चित केले होते. त्यापैकी १४ विभागांना संपर्क प्रमुख नेमता आले. ६६ गावांमधील वितरण केंद्रांवर १०० पेक्षा जास्त अंकांची नोंदणी झाली. पाच केंद्रांवर १,००० पेक्षा जास्त अंकांची नोंदणी झाली. मागील वर्षीपेक्षा निम्म्या खर्चात व दोन दिवसात यावर्षीचे वितरण पूर्ण झाले. वितरणासाठी वाहनांबरोबर जाण्यासाठी छात्र प्रबोधनच्या संपर्कातील रसायनी, मुंबई, पुणे, सातारा येथील १०-१२ युवक-युवती गेले होते.

यावर्षी मराठी दिवाळी अंक २२,०००, इंग्रजी अंक ४,४००, ग्रामीण अंक ६,५००, युवोन्मेष अंक ३,००० छापले. ४०० सीडी तयार केल्या. प्रत्येक अंकाच्या ब्रेलमध्ये ४० प्रती छापल्या आहेत. त्या औरंगाबाद, उद्गीर, कोल्हापूर, सांगली, मुंबई येथे पाठविल्या आहेत.

शारदाश्रम विद्यालय, दादर येथे ५०० विद्यार्थ्यांच्या उपस्थितीत 'छात्र प्रबोधन'चे प्रकाशन झाले. शारदाश्रम मुले व शारदाश्रम मुली या शाळांच्या मुख्याध्यापकांनी या कार्यक्रमात विशेष रस घेतला होता. लेखक एकनाथ आव्हाड व बोरीवली केंद्रावरील ४-५ कार्यकर्ते उपस्थित होते.

## • 'छात्र प्रबोधन'संबंधातील उपक्रम

दि. २ ते ४ मे दरम्यान इ. ८ वी ते १२ वी च्या विद्यार्थ्यांसाठी 'छात्र प्रबोधन' तर्फे **लेखन कार्यशाळा** आयोजित करण्यात आली होती. अकोल्याहून नऊ जणींचा गट लेखन कार्यशाळेसाठी आला होता. एकूण विद्यार्थी संख्या पंचवीस होती. तीन दिवसांच्या कार्यशाळेत ललितलेखन आणि कथा या साहित्य प्रकारांवर सौ. आश्लेषाताई महाजन, सौ. सुहासिनीताई देशपांडे, सौ. वीणाताई देव व सौ. मृणालिनीताई चितळे यांचे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन लाभले.

'छात्र प्रबोधन'च्या आगामी १-२ वर्षांकरिता मुखपृष्ठे कोणती असावीत यासाठी चित्रकारांची बैठक झाली. त्यात मान्यवर चित्रकार नाहीत पण त्यांची चित्रकला चांगली आहे अशा चित्रकारांचा समावेश व्हावा अशी अपेक्षा आहे. श्री. गिरीश सहस्रबुद्धे, श्री. दीपक संकपाळ हे चित्रकार या बैठकीला उपस्थित होते.

संत तुकाराम व समर्थ रामदास यांच्या चतुर्थ जन्मशताब्दी निमित्त संत ज्ञानदेव अध्यासन, पुणे विद्यापीठ व छात्र प्रबोधन यांच्या संयुक्त विद्यमाने जी निबंध स्पर्धा आयोजित केली होती त्याचा निकाल लागला. स्पर्धेला विद्यार्थ्यांचा भरघोस प्रतिसाद लाभला. २६४ निबंधांपैकी ३२ निबंधांना पारितोषिके देण्यात आली.

'भटकंती' या विषयावर दि. ४ फेब्रुवारीला चर्चासत्र झाले. अंकाची गुणवत्ता वाढण्यासाठी 'भटकंती' हा विषय अंकात कशाप्रकारे यावा ? मुलांची भटकंती 'डोळस' व्हावी ह्या दृष्टीने त्यांच्यासमोर निश्चित पट मांडता येईल का ? हे विषय चर्चिले गेले. या चर्चासत्राला बाहेरचे १५ सदस्य होते. उष:प्रभा पागे, आनंद पाळंदे, सुरेशचंद्र वारघडे, श्रीकांत लागू, राहुल मराठे, अनंत भावे, उमेश झिरपे यांनी आपले विचार मांडले.

## • शिबिरे, बैठकी

नंदुरबार येथे दि.१३ ते १५ एप्रिल या कालावधीत स्थानिक इ.९ वी च्या १४ विद्यार्थिनींच्या मदतीने, इ. ५ वी च्या ३० ते ३५ मुलींसाठी 'व्यक्तिमत्त्व विकसन शिबिर' घेण्यात आले. अदिती हर्डीकर व केतकी चंद्रात्रे यांनी या शिबिराची जबाबदारी सांभाळली.

कळसुबाई-रतनगड-हरिश्चंद्रगड येथे दि. १५ एप्रिल ते २० एप्रिल दरम्यान युवकांची गिरिभ्रमण सहल झाली. प्रा. महेंद्र सेठिया, सत्यजित केळकर व हृषीकेश दिवेकर यांच्या समवेत २१ युवक या सहलीत सहभागी झाले होते.

दि. २२ एप्रिल ते २६ एप्रिल दरम्यान मालेगाव येथे तेथील स्थानिक संयोजकांतर्फे इ. ५ वी ते ८ वी च्या मुलींसाठी 'व्यक्तिमत्त्व विकसन शिबिर' घेण्यात आले. ६५ मुलींचा चांगला प्रतिसाद शिबिराला मिळाला.

दि. २३ ते २९ एप्रिल दरम्यान 'छात्र प्रबोधन' तर्फे 'नेतृत्व संवर्धन' शिबिर घेण्यात आले. या शिबिरात २३ मुले व १६ मुली सहभागी झाल्या होत्या. मुला-मुलींसाठी एकाच वेळी स्वतंत्रपणे शिबिर घेण्यात आले. शिबिरातील पहिले चार दिवस प्रबोधिनीतच पार पडले. त्यानंतर सर्व विद्यार्थी ४-५ च्या गटाने वेल्हे तालुक्यातील ९ गावांमध्ये शिबिरे घेण्यासाठी गेले. ग्रामविकसन कार्याच्या त्या-त्या गावांतील संपर्क व्यक्तींच्या साह्याने ही शिबिरे संपन्न झाली. वेल्हे तालुक्यातील घिसर, केळद, दिघे आळी, सांगवी येथे प्रामुख्याने किशोरींची शिबिरे झाली. एकूण १४५ विद्यार्थिनी व विद्यार्थ्यांनी यात सहभाग घेतला.

दि. २२ जून रोजी केंद्र प्रमुखांची बैठक झाली. बैठकीला १८ केंद्रांवरचे २४ जण उपस्थित होते. 'छात्र प्रबोधन' मासिक म्हणून / उपक्रम म्हणून पुढच्या काळातली वाटचाल कशी असावी या संदर्भात मांडणी आणि गटचर्चा यावेळी झाल्या. श्री. प्रसाद चिक्षे यांचे 'अंबाजोगाई केंद्राची वाटचाल' या विषयावर अनुभव कथन झाले.

दि. २९ जून रोजी झालेल्या पदव्युत्तर युवक-युवती विशेष बैठकीला ८५ जणांपैकी ४२ जणांची उपस्थिती होती. आदल्या दिवशी रात्री सगळ्यांनी गेल्या ५ वर्षांतला आपला प्रवास मोकळेपणाने मांडला. दुसऱ्या दिवशी मा. विवेकराव कुलकर्णी यांनी 'देश परिस्थिती - काल, आज, उद्या आणि मी' यासंबंधी विस्तृत पट मांडला. त्याआधारे चार गटांमध्ये चर्चा झाली. संघटनात्मक उपक्रमांसंबंधी या गटांच्या बांधणीसंबंधी प्रास्ताविक मांडणी झाल्यावर कोण किती वेळ देऊ शकणार आहे त्यानुसार गट करून चर्चा झाली. मा. सुभाषरावांनी बैठकीचा समारोप केला.

दि. ६ फेब्रुवारी रोजी इचलकरंजी येथे 'छात्र प्रबोधन' सदस्यांसाठी एक दिवसाचे शिबिर घेतले गेले. त्याला १७ सदस्य हजर होते. श्री. अभिजित एकंबीकर यांनी हे शिबिर घेतले.

## • संकीर्ण

'छात्र प्रबोधन'चे मान्यवर लेखक, जाहिरातदार, प्रायोजक, प्रबोधिनीशी संबंधित ज्येष्ठ सदस्य, गावोगावचे हितचिंतक, कार्यकर्ते अशा जवळ जवळ ८५० जणांना यावर्षी गुढी पाडव्याच्या 'सुगंधित' शुभेच्छा पाठवल्या. अदिती जोगळेकर-हर्डीकर, अनुराधा शेजूळ, तेजस्वी भुरके आणि अबोली धायरकर या चित्रकार प्रबोधिकांनी ही शुभेच्छापत्रं देखणी केली होती. 'छात्र प्रबोधन'च्या वार्षिक कामाचा आढावा घेणारे वृत्त तीन वर्षानंतर पाठवण्यात आलेल्या या शुभेच्छा पत्रांबरोबर पाठवण्यात आले.

गिरगावची कु. अदिती पित्रे ही दि. २४ मार्च ते १५ एप्रिल दरम्यान प्रबोधिनीत कामासाठी आली होती. विभागातील नित्यनैमित्तिक कामे, हर्षाताईंसोबत शिवापूर, हडपसर येथे भेट व प्रशालेतील इ. ९ वी च्या विद्यार्थिनींबरोबर सोलापूर, यमगरवाडी, हराळी येथे प्रवास झाला.

युवकांच्या 'प्रतिज्ञा-ग्रहण' समारंभात 'छात्र प्रबोधन'च्या संपर्कातून प्रबोधिनीच्या प्रवाहात सहभागी झालेले श्री. शंतनू इनामदार यांनी द्वितीय प्रतिज्ञा घेतली.

'छात्र प्रबोधन'च्या सौर चैत्रच्या वासंतिक विशेषांकात 'चला घेऊया शिबिर' हा लेख प्रसिद्ध झाला होता. त्या लेखातील आवाहनाप्रमाणे सावंतवाडी, हुपरी, अकोले आणि पुणे येथे 'उन्हाळ्यातील ४ दिवसांचे शिबिर' इ. ९ वी ते १२ वी च्या विद्यार्थ्यांनी इ. ४ थी ते ७ वीच्या मुलामुलींसाठी घेतले. प्रत्येक ठिकाणी शिबिर घेणारे ४ ते ५ तर शिबिरार्थी ३० ते ४० च्या दरम्यान होते.

छात्र प्रबोधनच्या सदस्यांची सहल दि. १३ व १४ डिसेंबर रोजी दिवेआगर व हरिहरेश्वर येथे जाऊन आली. त्यामध्ये १२ सदस्यांनी सहभाग घेतला होता.

दि. २१ डिसेंबर २००८ रोजी स्नेह मेळावा झाला. त्याला ८० जण उपस्थित होते. त्यामध्ये लेखक, हितचिंतक, देणगीदार व त्यांचे कुटुंबिय यांची उपस्थिती होती.

दि. १० जानेवारीला छात्र प्रबोधन तर्फे वास्तूतील इतर विभागातील सदस्यांसाठी डी. टी. पी. च्या संदर्भात एक कार्यशाळा आयोजित केली होती. श्री. नागेश बाठे यांनी सदस्यांना मार्गदर्शन केले. प्रबोधिनीतील सदस्यांचा या कार्यशाळेला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. इतर विभागातून एकूण १२ सदस्यांची उपस्थिती या कार्यशाळेला होती.

## • प्रकाशने

प्रा. महेंद्र सेठिया यांच्या 'आश्वासक पालकत्व' या पुस्तकाचे प्रकाशन दि. ६ एप्रिल रोजी झाले. या कार्यक्रमात पालकांसाठी एक कार्यशाळा आयोजनही करण्यात आले होते. तिला जवळ जवळ २५० जणांचा उत्तम प्रतिसाद मिळाला. प्रज्ञा मानस संशोधिका आणि संवादिनी या विभागातील सदस्यांनी कार्यशाळेच्या नियोजनात मुख्य भूमिका बजावली. पुस्तकाच्या २२५ प्रतींची विक्री यावेळी झाली.

'कल्पक बनूया' या मा. अशोकराव निरफराके यांच्या पुस्तकाचा त्यांनी स्वत: केलेला इंग्रजी अनुवाद 'Be Creative' या नावाने दि.१५ मेच्या दरम्यान 'छात्र प्रबोधन' तर्फे प्रकाशित झाला. या अनुवादाच्या पेपरबॅक आणि हार्डबाऊंड अशा दोन स्वरूपात आवृत्त्या निघाल्या.

# स्पर्धा परीक्षा केंद्र

## • केंद्रीय लोकसेवा आयोग (UPSC)

केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या नियमित तुकडीचे सामान्य अध्ययन, लोकप्रशासन, राज्यशास्त्र, मानसशास्त्र, भूगोल या विषयांचे मुख्य परीक्षा व पूर्व परीक्षांचे वर्ग झाले. या सर्व विद्यार्थ्यांनी २००९ ची पूर्व परीक्षा दिली. या मार्गदर्शनाचा लाभ सुमारे ३०० विद्यार्थ्यांनी घेतला.

**२००८ : मुलाखत प्रशिक्षण वर्ग - प्रेरणा तुकडी**

केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या मुलाखत प्रशिक्षण वर्गाची चार अध्ययन संचांमध्ये विभागणी केली होती

१. मुलाखत कशी द्यावी याविषयी व्याख्याने व अनुभव कथन

२. व्यक्तिमत्त्व चाचण्यांमधून व्यक्तिमत्त्वाची ओळख

३. सेमिनार, गटचर्चा, गटमुलाखती अशी गटकार्ये ह्रह्र राळेगणसिद्धी, हिवरे बाजार, पाबळ येथे अभ्याससहली, अकोला, गडचिरोली व ठाणे येथे प्रशासन व विकासातील असमतोल याचा अभ्यास करण्यासाठी जिल्हा अभ्यासदौरे झाले.

४. विविध सद्य घटनांवर तज्ज्ञ व्यक्तींची व्याख्यानमाला व सराव मुलाखती.

या प्रशिक्षण वर्गाचा लाभ ८० विद्यार्थ्यांनी घेतला.

**अंतिम निर्णय** - केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या परीक्षेचा अतिशय उत्तम निकाल लागला. यावर्षी १२ IAS, १२ IPS, १२ IRS (Income Tax) , १२ IRS (Custom and Excise) व अन्य असे मिळून ५९ जण महाराष्ट्रातून अधिकारी झाले. यापैकी ४० जण आपल्या केंद्रात मार्गदर्शन घेतलेले विद्यार्थी होते. कु. संपदा मेहता ही आपली विद्यार्थिनी महाराष्ट्रात प्रथम आली. महाराष्ट्राच्या दृष्टीने इतके IAS व IPS अधिकारी निवडले जाणे हा ऐतिहासिक निर्णय ठरला.

**मुख्य परीक्षा तयारी** Mission 1200 - पूर्वपरीक्षा दिलेल्या विद्यार्थ्यांसाठी मुख्य परीक्षेचा तीन महिन्यांचा मार्गदर्शन वर्ग झाला. यामध्ये मागील वर्षी IAS, IPS पदांवर निवड झालेल्या विद्यार्थ्यांनी मसूरीला जाण्यापूर्वी मार्गदर्शन पूर्ण केले. यामध्ये सामान्य अध्ययन, लोकप्रशासन, राज्यशास्त्र, भूगोल, मानसशास्त्र या विषयांचे वर्ग झाले. ११० विद्यार्थ्यांनी या वर्गाचा लाभ घेतला.

**नवीन वर्षारंभ व उत्तीर्ण विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ** - केंद्रीय लोकसेवा आयोग परीक्षेत निवड झालेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ वर्षारंभ कार्यक्रमात करण्यात आला. वर्षारंभ उपासना, विद्यार्थी शपथग्रहण, सत्कार, पाहुण्यांचे मार्गदर्शन व पालक-शिक्षकांसह सहभोजन असे कार्यक्रमाचे स्वरूप होते. या कार्यक्रमाला श्री. प्रवीणसिंह परदेशी (आयुक्त, पुणे महानगरपालिका) व श्रीमती सुधाताई कोठारी (प्रमुख, चैतन्य संस्था, राजगुरुनगर) हे पाहुणे म्हणून उपस्थित होते.

## • महाराष्ट्र लोकसेवा आयोग (MPSC)

**मुख्य परीक्षा तुकडी : जिज्ञासा** - राज्य लोकसेवा आयोगाच्या मुख्य परीक्षेच्या सामान्य अध्ययन, भूगोल, लोकप्रशासन, राज्यशास्त्र व मानसशास्त्र या विषयांच्या मार्गदर्शन तुकड्या झाल्या. यामध्ये ३५० विद्यार्थ्यांनी लाभ घेतला.

**मुख्य परीक्षा** - राज्य लोकसेवा आयोगाच्या दोन मुख्य परीक्षा जून व डिसेंबर २००८ या महिन्यांमध्ये झाल्या व त्यांचा निकाल लागून मुलाखती झाल्या.

**मुलाखत प्रशिक्षण वर्ग** - मे २००८ व मार्च २००९ या महिन्यांमध्ये राज्य लोकसेवा आयोगाचे मुलाखत प्रशिक्षण वर्ग झाले. यामध्ये अनुक्रमे ३०० व २५० विद्यार्थी सहभागी झाले. या वर्गांमध्ये आठ दिवस रोज आठ तासांचे वेळापत्रक होते. शासन यंत्रणेचा परिचय, सद्य घटना, मुलाखत तयारी कशी करावी, अनुभव कथन, अशा प्रकारे सत्रांची रचना होती. व्याख्याने, गटचर्चा व गट मुलाखती या पद्धतींचा वापर करण्यात आला. ज्येष्ठ प्रशासकीय अधिकारी तसेच केंद्राचे माजी विद्यार्थी अधिकारी मार्गदर्शक म्हणून लाभले. सर्व विद्यार्थ्यांच्या सराव मुलाखतीही घेण्यात आल्या.

राज्य लोकसेवा आयोग मुलाखतीचे निकाल वृत्तांत वर्षात उत्तम लागले असून एका परीक्षेत केंद्राचे ११० विद्यार्थी उत्तीर्ण झाले. दत्तू नवले हा महाराष्ट्रात दुसरा आला. दुसऱ्या परीक्षेत केंद्राचे १२२ जण निवडले गेले. महाराष्ट्रात पहिले सातही क्रमांक आपल्या विद्यार्थ्यांनी मिळवले. शमा ढोक ही महाराष्ट्रातून पहिली आली. नवीन अभ्यासक्रमावरची ही पहिलीच परीक्षा होती.

**राज्य लोकसेवा आयोग उत्तीर्ण विद्यार्थ्यांचा सत्कार** - राज्य लोकसेवा आयोग परीक्षा उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ दि. २८ सप्टेंबर रोजी संपन्न झाला. श्री. रियाज पठाण (निवृत्त IAS) व श्री. मंदार केळकर (विक्रीकर उपायुक्त) हे कार्यक्रमाचे पाहुणे होते. अन्य ज्येष्ठ सदस्य व पाहुणे अशा सात जणांनी एकावेळी सात विद्यार्थ्यांचा सत्कार केला. अशा प्रकारे सत्कार करण्याचे कारण म्हणजे यशस्वी विद्यार्थ्यांची भरघोस संख्या.

## • संवाद पत्रिका

संवाद हे अ-नियतकालिक नियमितपणे सर्व अधिकारी व ज्येष्ठ सदस्यांना पाठवता आले. यावर्षी १० अंक प्रकाशित केले.

## • भेटी

केंद्रीय लोकसेवा आयोगातून निवड झालेल्या IAS, IPS विद्यार्थ्यांचे प्रशिक्षण मसूरी येथे असते. त्याठिकाणी INDIA DAY या सांस्कृतिक कार्यक्रमाला श्री. विवेक कुलकर्णी व सौ. सविता कुलकर्णी हे उपस्थित होते. आपले २० विद्यार्थी याठिकाणी प्रशिक्षण घेत होते.

त्याच वेळी दिल्ली येथे आपल्या केन्द्राच्या ज्येष्ठ विद्यार्थी अधिकाऱ्यांचा मेळावा आपले स्नेही श्री. अजितराव कानिटकर यांच्या घरी झाला. दिल्ली, हरियाणा येथील अधिकारी यात सहभागी झाले.

हैद्राबाद येथे IRS व अन्य विद्यार्थ्यांचे प्रशिक्षण परिचेन्ना रेड्डी प्रशिक्षण संस्थेत होते. याठिकाणीही श्री. व सौ. कुलकर्णी भेट देऊन विद्यार्थ्यांच्या कार्यक्रमात सहभागी झाले.

नागपूर, चंद्रपूर व वर्धा येथे कार्यरत असलेल्या आपल्या विद्यार्थी अधिकाऱ्यांचा मेळावा श्री. व सौ. कुलकर्णी यांनी नागपूर येथे घेतला. यावेळी कामातल्या अडचणी व अनुभव यावर चर्चा झाली.

सांगली येथे जिल्हाधिकारी श्री. शाम वर्धने यांच्या उपस्थितीत सांगली येथील ज्ञान प्रबोधिनीचे कार्यकर्ते व केंद्राचे अधिकारी यांचे सहभोजन झाले. यानंतर सांगली, मिरज, जयसिंगपूर येथील आपल्या अधिकाऱ्यांबरोबर श्री. व सौ. कुलकर्णी यांनी अनुभव व कामातल्या अडचणींवर चर्चा केली.

कोल्हापूर येथील आपल्या प्रशासकीय अधिकाऱ्यांबरोबर श्री. व सौ. कुलकर्णी यांच्या गप्पा झाल्या.

या सर्व भेटींमधून विद्यार्थी अधिकाऱ्यांना समविचारी गटाबरोबर चर्चा केल्यामुळे मार्गदर्शन मिळते.

- **आकाशवाणी केंद्र - मालिका**

पुणे आकाशवाणी केंद्रावर सौ. सविता कुलकर्णी व स्पर्धा परीक्षा केंद्रातील अन्य अध्यापकांनी मिळून राज्य लोकसेवा आयोग परीक्षा ओळख व मार्गदर्शन करणारी ५ व्याख्यानांची मालिका सादर केली.

~~~

♦ **केंद्रीय लोकसेवा आयोग परीक्षा निर्णय**

केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत स्पर्धा परीक्षा केंद्राचे एकूण ३६ विद्यार्थी विविध पदांसाठी निवडले गेले. त्यापैकी IAS - ४, IPS - ८, IRS - ८, ICES- ९, IFS- १, अन्य - ६ अशी पदांची विभागणी आहे. या विद्यार्थ्यांचा सत्कार वर्षारंभ उपासनेप्रसंगी मा. उषाताई खिरे, मा. गिरीशराव बापट व मा. सुभाषराव देशपांडे यांच्या हस्ते करण्यात आला.

♦ **राज्य लोकसेवा आयोग २००६ निर्णय**

राज्य लोकसेवा आयोग २००६ परीक्षेचा निकाल बऱ्याच प्रतीक्षेनंतर जून २००९ ला लागला. स्पर्धा परीक्षा केंद्राची विद्यार्थिनी सौ. शमा ढोक-पवार ही महाराष्ट्रात सर्वप्रथम आली. त्याचप्रमाणे यादीतील पहिले सात क्रमांक मिळविण्याचा मान आपल्या विद्यार्थ्यांनी मिळविला. एकूण १२२ विद्यार्थी-विद्यार्थिनींनी विविध पदांवर यश संपादन केले.

♦ **संवाद**

- 'संवाद' या स्पर्धा परीक्षा केंद्राच्या अ-नियतकालिकामधील निवडक लेख, अधिकाऱ्यांचे अनुभव तसेच 'परिणामकारक अधिकारी' ही लेखमाला असलेल्या तीन पुस्तिकांचे प्रकाशन झाले. प्रशासकीय यंत्रणेमध्ये काम करताना या लेखांचा मार्गदर्शक म्हणून उपयोग होईल.

- संवाद दिवाळी अंक २००९ पासून ज्ञान प्रबोधिनीच्या http://downloads.jnanaprabodhini.org या संकेतस्थळावर उपलब्ध असेल.
~~~

# नवनगर विद्यालय, निगडी

## • शालान्त परीक्षा व स्पर्धांमधील यश

दि. २६ जून रोजी इ. १० वीचा शालांत परीक्षेचा निर्णय समजला. मराठी माध्यमातील १७५ विद्यार्थ्यांपैकी ८३ विद्यार्थ्यांनी विशेष गुणवत्ता मिळवली. इंग्रजी माध्यमातील ५० विद्यार्थ्यांपैकी ३९ विद्यार्थी विशेष गुणवत्ता मिळवून उत्तीर्ण झाले. शाळेतील मराठी माध्यमाचा निर्णय ९७.१४% व इंग्रजी माध्यमाचा निर्णय १००% लागला. अदिती साळुंके व शाल्मली खर्चे ह्या विद्यार्थिनी ९४% मिळवून इंग्रजी तृतीय भाषा विषयात पहिल्या आल्या.

विद्यालयातील अनेक विद्यार्थ्यांनी दरवर्षीप्रमाणे शिष्यवृत्ती परीक्षा,प्रज्ञाशोध परीक्षा, एलिमेंटरी व इंटरमिजिएट इ. चित्रकला परीक्षा यामध्ये सहभाग घेउन विविध स्तरावर यश मिळविले. पैकी उल्लेखनीय यश पुढील प्रमाणे

- एलिमेंटरी परीक्षेत १३१ विद्यार्थ्यांपैकी ५३ जणांना प्रथम श्रेणी व इंटरमिजिएट मध्ये ७८ जणांपैकी १६ जणांना प्रथम श्रेणी मिळाली.
- इ. ७ वी मराठी माध्यमाच्या चि. अथर्व महेश देसाई याने शिष्यवृत्ती परीक्षेत ३०० पैकी २४६ गुण मिळवून शहर पातळीवर २९ वा क्रमांक मिळविला.
- महाराष्ट्र प्रज्ञा शोध परीक्षेचा निकाल जाहीर झाला. पुढील विद्यार्थ्यांनी विशेष गुण मिळविले.व्यंकटेश काटकर १९१/२५० राज्यस्तरीय १७ वा, निखिल चैसास १८६/२५० राज्यस्तरीय २२ वा, मैत्रेयी निकम १७५/२५० जिल्हास्तरीय ६ वा, आसावरी अंबिके १६२/२५० उत्तेजनार्थ.
- राष्ट्रीय प्रज्ञा शोध शिष्यवृत्ती शशांक शहाणे, इ. १० वी तील निखिल चैसास व इ. ८वी तील व्यंकटेश काटकर या विद्यार्थ्यांना मिळाली.

## • कला व क्रीडेतील यश

पारनेर तालुका मित्रमंडळ तर्फे कु. अरुजा बुरुडे हिचा पखवाज वादनातील कामगिरीबद्दल उच्च शिक्षण व ऊर्जा राज्यमंत्री श्री. दिलीप वळसे पाटील यांच्या हस्ते सत्कार झाला.

शृंगेरी येथे झालेल्या संपूर्ण गीतापठण स्पर्धेत चि. लोकेश भोसले हा सहभागी होता. तेथे त्याने प्रथम क्रमांक मिळविला. त्याला रु.२१,०००/-चे पारितोषिक मिळाले.

राज्य पातळीवर झालेल्या खो-खो स्पर्धेमध्ये विद्यार्थ्यांनी दुसरा क्रमांक मिळविला.

क्रीडाकुलच्या विद्यार्थ्यांनी राज्यस्तरीय स्पर्धेत १११ खेळाडू सहभागी होउन ८१ जणांनी पदक मिळविले. तर राष्ट्रीय स्तरावर ३१ खेळाडू सहभागी होउन १२ जणांनी पदक मिळविले.

इ. १० वी मराठी माध्यमातील कु. इरा लिमये हिने राज्य पातळीवरील योगास्पर्धा जिंकली. त्यामुळे तिची राष्ट्रीय पातळीवरील योगास्पर्धेत निवड झाली.

इ. ७वी तील प्राची बहाळकरची राज्यस्तरीय योगासन स्पर्धेसाठी निवड झाली व चौथा क्रमांक प्राप्त झाला.

हाँगकाँग येथे झालेल्या आंतरराष्ट्रीय स्तरावरील स्केटींग स्पर्धेत इ. ६वी तील सानिका गुळवणीने तृतीय क्रमांक मिळवला.

## • क्रीडा प्रात्यक्षिके

दि. २२ डिसेंबर रोजी सायं. ४.३० वा. क्रीडा प्रात्यक्षिके झाली. यामध्ये संचलन, बशी कवायत, लेझीम, मानवी मनोरे, इ. १९ प्रकारचे विविध क्रीडा प्रकार होते. घोडेस्वारीचा प्रथमच यामध्ये समावेश केला होता. प्रत्येक क्रीडा प्रकारामध्ये ४० ते ७५ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. एकूण १००० विद्यार्थ्यांनी भाग घेतला.

दि. २७ फेब्रुवारी रोजी प्राथमिक विभागाची क्रीडा प्रात्यक्षिके झाली. इ. १ली ते ४थीच्या विद्यार्थ्यांनी यामध्ये सहभाग घेतला होता. संगीत कवायत, योगासने, सूर्यनमस्कार, जिम्नॅस्टिक आणि स्केटींग याचे सादरीकरण केले. या वर्षी पहिल्यांदाच प्राथमिक विभागाने स्वतंत्रपणे क्रीडा प्रात्यक्षिके केली.

## • राष्ट्रकुल युवा क्रीडा स्पर्धांमध्ये सहभाग

राष्ट्रकुल युवा क्रीडा स्पर्धा २००८ सुरू व्हायच्या आधी प्रत्येक शाळेला एक देश अभ्यास करण्याकरिता दिलेला होता. नवनगर विद्यालयाकडे फिजी बेटांचा अभ्यास सोपविला होता. या बेटांविषयीची भौगोलिक, ऐतिहासिक, सांस्कृतिक, तेथील परंपरा, अर्थव्यवस्था,खेळ, उत्सव, वातावरण व तेथील चलन याविषयीची माहिती विद्यार्थ्यांनी गोळा करून, संकलित स्वरूपात सादर केली.दि. १० ऑक्टोबर रोजी फिजी येथील खेळाडूंनी शाळेला भेट दिली. दसऱ्याच्या दिवशी बाबुराव सणस उद्यान ते बालेवाडी पर्यंत काढलेल्या मिरवणुकीमध्ये नवनगर विद्यालयाने सहभाग घेतला होता. यामध्ये ७१ शाळांनी ७१ विविध देशांचे रथ सजविले होते. नवनगर विद्यालयाने फिजी बेटांचे पारंपारिक जीवन त्या रथामध्ये सादर केले होते.

नवनगर विद्यालयातील ६०० विद्यार्थ्यांनी राष्ट्रकुल युवा क्रीडा स्पर्धांच्या उद्घाटन समारंभात भाग घेतला होता. यापैकी ४५० विद्यार्थ्यांनी ॲथलेटिक्स्, पोहणे, कुस्ती, टेनिस व बॅडमिंग्टन या क्रीडा प्रकारांच्या कवायती सादर केल्या. शंभर विद्यार्थ्यांनी मल्लखांबाचे व ५० विद्यार्थिनींनी योगासनांचे प्रात्यक्षिक सादर केले.

## • विद्यार्थी शिबिरे

दि. २४ ते २६ जुलै या कालावधीमध्ये इ. १० वी इंग्रजी माध्यमातील १२५ विद्यार्थी कोल्हापूर व अंबोली येथे क्षेत्रभेटीसाठी गेले होते.

दि. २७ ते २९ नोव्हेंबर रोजी इ. ५ वी ते १०वी तील विद्यार्थ्यांसाठी

व ७वी ते १०वी तील विद्यार्थिनींसाठी स्वतंत्र शिबिरे झाली.

दि. २६ जानेवारी ते ३१ जानेवारी रोजी मराठी माध्यम माध्यमिक विभागातील १०४ विद्यार्थी व ९ शिक्षक यांची कान्हा अभयारण्यात सहल गेली होती. द इनसर्च फाऊंडेशन यांनी सहलीच्या आयोजनात मदत केली होती.

गुरुकुलाची यावर्षी छोटी व मोठी सायकल सहल १०० कि.मी. व ३०० कि. मी. एकत्रच गेल्या होत्या. इ. ६ वी ते ९ वीचे ४१ विद्यार्थी सहभागी झाले होते. जुन्नर, कर्जत, खेड व पेठ घाट उतरले व गणेशखिंड घाट चढून मढमध्ये मुक्काम केला. माळशेज घाट उतरून कर्जत (कडाव) येथे श्री. प्रल्हाद शिंदे यांच्या घरी मुक्काम करून परतीच्या प्रवासास लोणावळा, खंडाळा मार्गाने आले.

दि. २ ते ४ जानेवारी या दरम्यान इ. ८ वीच्या विद्यार्थ्यांसाठी विद्याव्रत पूर्वतयारी शिबिर योजले होते. व्याख्याने, गटचर्चा, वादविवाद, दल यांचा या शिबिरामध्ये समावेश होता.

**गुरुकुल** - दि. २ एप्रिल रोजी पश्चिम बंगाल येथे एकूण २१ विद्यार्थी शिबिरास गेले. श्री. भावसार, श्री. श्रीकृष्ण अभ्यंकर आणि सौ. उषाताई पिंपुडे विद्यार्थ्यांसोबत शिबिराला गेले होते.

दि. १० एप्रिल ते १४ एप्रिल या कालावधीत ६६ विद्यार्थी, सौ. अरुणाताई पटवर्धन, सौ. स्मिताताई झणझणे, श्री. अंबादास शेलार व काही पालक मालवण-मोगरणे जि. सिंधुदुर्ग येथे शिबिरासाठी गेले होते. तेथे नेतृत्व विकसनाच्या उपक्रमाबरोबरच कोकण परिसर व तेथील जनजीवन याचा आस्वाद घेतला.

**आसाम अभ्यास सहल** - दि. २५ एप्रिल ते ९ मे दरम्यान १६ जणांची आसाम राज्यात अभ्यास सहल झाली. आसाममधील निसर्गाची समृद्धी अनुभवणे आणि तिथल्या संस्कृतीविषयी व प्रश्नांविषयी परिचय करून घेणे असा उद्देश होता. काझीरंगा अभयारण्य,विशनाथ (जि. तेजपूर), उदालगुडी, भैरवकुंड, गुवाहाटी, शिलाँग या ठिकाणांना भेटी दिल्या. काझीरंगा अभयारण्यात सुरु असलेल्या बिहू सणामध्ये सदस्य सहभागी झाले. जाताना व येताना कोलकात्यात उपलब्ध वेळात विवेकानंदांचे जन्मस्थळ, बेलूर मठ, नेताजी भवन या ठिकाणांना भेटी दिल्या.

- **अध्यापक उपक्रम**

स्टीव्हन्स् रिसर्च इन्स्टिट्यूट, न्यूजर्सी यांच्यातर्फे आयोजित करण्यात आलेल्या आंतरराष्ट्रीय नदीजोड प्रकल्पामध्ये सहभागी होण्याची संधी सौ. विद्याताई उदास, सहअध्यापिका यांना मिळाली. ही कार्यशाळा न्यूजर्सी व न्यूयॉर्क येथे दि. ३० मार्च ते १२ एप्रिल या कालावधीत पार पडली. नेपाळ, बांग्लादेश, भारत व अमेरिका या चार देशांमधील अध्यापकांना या कार्यशाळेमध्ये प्रशिक्षण दिले गेले. डिसेंबर २००८ पर्यंत हा प्रकल्प चालू होता.

दि. २१ व २२ जाने.०९ या कालावधीत भारत - ब्रिटन शैक्षणिक आदान-प्रदान या उपक्रमांतर्गत इंग्लंडच्या ब्लेस्ड एडवर्ड ओल्ड कॉर्न या शाळेतील इ.९वी तील ७ खेळाडू आणि राष्ट्रीय खेळाडू - प्रशिक्षिका शेर्लोट किज यांची भेट क्रीडाकुल प्रकल्पास झाली. या भेटीदरम्यान त्यांनी क्रीडाकुलची संकल्पना समजावून घेण्याचा प्रयत्न केला. तसेच आपल्या खेळाडूंना रग्बी - अमेरिकन फुटबॉल हा खेळ शिकविला.

दि. ९ ऑगस्ट रोजी मराठी विषयाच्या अध्यापकांसाठी दिवसभराची कार्यशाळा आयोजित केली होती. यामध्ये श्री. शरद उपाध्ये यांनी 'मराठी भाषेतील व व्याकरणातील गुंतागुंत' याविषयावर विविध सत्रे घेतली.

विद्यालयातील दोन शिक्षक आणि प्राचार्या सौ. सुमनताई शेणॉय यांनी I*EARN (International Educational and Resource Network) India यांनी आयोजित केलेल्या अडोब सॉफ्टवेअर या विषयावरील कार्यशाळेत भाग घेतला व विद्यालयाला अडोब संगणक प्रणालीची प्रमाणित प्रत मिळाली.

- **अध्यापक शिबिरे**

यावर्षी शिक्षकांचे शिबिर दोन भागांमध्ये घेण्यात आले. उन्हाळी सुट्टी सुरू होण्यापूर्वी दि. २९ व ३० एप्रिलला शिबिराचा पूर्वार्ध झाला. 'पंचकोश विकसनातून उत्तमता' हा शिबिराचा विषय होता. शिबिराचा उत्तरार्ध दि. १२ जूनला झाला. यामध्ये प्रत्येक कोशानुसार शिक्षकांचे गट करून चर्चेद्वारे येत्या वर्षासाठीचा कृती आराखडा तयार करण्यात आला.

दि. ३० व ३१ जानेवारी रोजी गुरुकुलमध्ये अध्यापकांची प्रदीर्घ बैठक होती. शिरगाव येथील साई मंदिरात ही बैठक संपन्न झाली.

ज्ञानगंगा विद्यामंदिर, मंची हिल (नगर) येथे अध्यापक प्रशिक्षण वर्ग घेण्यास शिवराजदादा, आदित्यदादा, श्री. व्यंकटराव भताने व मा. भाऊ गेले होते.

- **प्रदर्शन**

श्री. अशोक कामथे यांनी शिक्षकांसाठी चित्रकला प्रदर्शन भरवले होते. त्यामध्ये श्री. कामथे यांनी काढलेली ३७ चित्रे होती.

दि. ११ फेब्रुवारी रोजी विज्ञान प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते. प्रत्येक वर्गास वेगळा विषय दिल्यामुळे उपकरणांमध्ये वैविध्य आले होते. ऊर्जा, पर्यावरण, जैव तंत्रज्ञान, खेळण्यांमागील वैज्ञानिक तत्त्व आणि मुक्त असे विषय होते.

बालभवनातील विद्यार्थ्यांनी वर्षभर केलेल्या हस्तव्यवसायाचे प्रदर्शन भरवण्यात आले.

दि. २८ फेब्रुवारी रोजी 'संकटकालीन व्यवस्थापन' या विषयांतर्गत संकटातून सुटका कशी करून घ्यायची याचे प्रात्यक्षिक झाले. या कार्यक्रमाची आखणी गतवर्षीच्या इंग्रजी माध्यमाच्या इ. ९वी च्या वर्गाने केली होती व या वर्षीच्या इ.९वीच्या वर्गाने कार्यक्रमाचे आयोजन केले होते. आपत्तीग्रस्त जागेतून २ मिनिटांत

१००० विद्यार्थ्यांची सुटका कशी करायची याचे प्रात्यक्षिक झाले.

- **कार्यक्रम व समारंभ**

दि. १४, १५ व १६ जूनला क्रीडाकुलतर्फे दशकपूर्ती वर्ष साजरे करण्यात आले. यावेळेस विद्यार्थ्यांसाठी 'खेळाडू तुमच्या भेटीला', पालकांसाठी 'तंदुरुस्त श्री. व सौ.'स्पर्धा, क्रीडाप्रात्यक्षिके आणि 'सुवर्णसाधना' या स्मरणिकेचे प्रकाशन इ.कार्यक्रम झाले.

दि. १६जून रोजी गुरुकुलचा विद्याव्रत संस्कार संपन्न झाला. पुण्यातील न्यू इंग्लिश स्कूल, रमणबागचे माजी प्राचार्य श्री. अरविंद हर्षे आचार्य म्हणून आणि सौ. शैलजाताई कुलकर्णी आचार्या म्हणून लाभले होते. तसेच याच दिवशी वर्षारंभाचेही आयोजन केले होते. इस्लामपूरमधील ज्येष्ठ नेते श्री. आण्णा डांगे हे या कार्यक्रमास प्रमुख अभ्यागत म्हणून लाभले होते.

दि. २१ जून रोजी माध्यमिक विभागाचा वर्षारंभ समारंभ झाला. चार वेगवेगळ्या गटांना वेगवेगळ्या पाहुण्यांनी मार्गदर्शन केले.

दि. २९जून रोजी गुरुकुलच्या इ. ९ वीच्या विद्यार्थ्यांनी ज्ञानेश्वर महाराजांच्या पालखीसोबत हडपसर ते दिवेघाट असा पायी प्रवास अभंग म्हणून पूर्ण केला.

दि. १ जुलै रोजी स्नातक संस्काराचे आयोजन केले होते. यासाठी प्रमुख अभ्यागत म्हणून श्री. रामभाऊ डिंबळे हे उपस्थित होते.विशेष पराक्रम केलेल्या स्नातकांची निवेदने व मा. रामभाऊ डिंबळे यांचे मार्गदर्शन असे कार्यक्रमाचे स्वरूप होते. सतवासा येथे घेतलेले व्यक्तिमत्त्व विकसन शिबिर, गिर्यारोहण, सायकल सहली, दिल्ली, राजस्थान येथे गेलेले अभ्यासदौरे यांमध्ये सहभागी झालेल्या स्नातकांनी उपक्रमातील सहभागाचे व अनुभवांचे निवेदन केले.

दि. ३ जुलै रोजी ह्या विद्यार्थ्यांचा बक्षीस वितरण व कौतुक समारंभ झाला. ह्या समारंभासाठी कोकण रेल्वेचे माजी व्यवस्थापक डॉ. केतन गोखले प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

दि. १९ जुलै रोजी मातृमंदिर संस्थेने गुरुपौर्णिमेचा समारंभ साजरा केला. यामध्ये 'राधामाता पुरस्कार' श्रीमती मालन लक्ष्मण कोंडे (श्री. शिवाजी कोंडे यांच्या आई), श्री. संतोषजी भणगे यांना 'अध्यापकोत्तम पुरस्कार' व श्री. सुदामजी भोंडवे यांना 'गुरुगौरव', श्री. राजदत्तजी यांना 'तपस्वी पुरस्कार' देण्यात आला. श्रीमती अरुणाताई पटवर्धन उच्च प्राथमिक विभागाच्या प्रमुख यांना 'यशवंत पुरस्काराने' सन्मानित करण्यात आले, श्री. व्यंकटराव भताने यांना 'ज्ञानवंत पुरस्कार', डॉ. हिराताई आद्यंताया (टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या माजी कुलगुरु) ह्या प्रमुख पाहुण्या म्हणून लाभल्या होत्या.

ऋषीपंचमीच्या दिवशी महापुरुष पूजन झाले. वैदिक, बौद्ध, जैन, शीख व महानुभाव पंथातील मान्यवर व्यक्ती या कार्यक्रमास उपस्थित होत्या. विविध धर्मग्रंथातील श्लोकांचे पठण झाले. या वेळेला डॉ प्र. ल. गावडे, शाहीर योगेश, कॅ. कदम, श्री. राजदत्तजी, डॉ. वि. य. कुलकर्णी यांचे ऋषी म्हणून पूजन झाले.

दि. ३ सप्टेंबर रोजी गणेश प्रतिष्ठापनेचा कार्यक्रम संपन्न झाला. गणेशोत्सवाच्या निमित्ताने श्री. विवेक वेलणकर, मा. वामनराव, श्री. संतोष गोंधळेकर आणि श्री. गिरीश कुबेर यांची व्याख्याने आयोजित केली होती.

दि. ९ सप्टेंबर सकाळी ९.०० ते १० सप्टेंबर सकाळी ९.०० अशा चोवीस तासात अथर्वशीर्षाचे अखंड पठण केले. युवक-युवती विभागाने २,५०० झाडांच्या रोपांचे विद्यार्थी, पालक व परिसरातील नागरिकांना वाटप केले.

या वर्षी गणेश विसर्जन शाळेच्या आवारातच झाले. यावेळी बर्चीनृत्ये व लेझीम यांची स्थिर प्रात्यक्षिके झाली. युवक व युवती विभागातर्फे परिसरातील सुमारे १२५ नागरिकांना गणेश प्रतिष्ठापनेचे प्रशिक्षण दिले.

दि. ११ सप्टेंबर रोजी मातृमंदिर विश्वस्त संस्थेतर्फे मा. विनोबा भावे यांची जयंती साजरी केली. या दिवशी प्रतिवर्षीप्रमाणे अध्यापक व विद्यार्थी यांच्याकरिता घेतलेल्या निबंध लेखनाच्या स्पर्धेचा बक्षीस समारंभ झाला.

दि. २४ नोव्हेंबर रोजी सर्व सदस्यांची एक सभा झाली. वर्षारंभाच्या संकल्पांच्या प्रकाशात पहिल्या सत्राचा आढावा घेण्यात आला.

यंदा गुरुकुल तर्फे सुकामेवा विक्री उपक्रम राबविण्यात आला. सुमारे ७ लक्ष २० हजार रुपयांची विक्री झाली.

मातृमंदिर विशस्त संस्थेच्या समूहगायन स्पर्धेच्या पारितोषिक वितरण प्रसंगी श्री. शिवराज पिंपुडे यांनी लिहिलेल्या 'शैक्षणिक उपक्रमांचे व्यवस्थापन' या पुस्तकाचे प्रकाशन झाले.

स्पिकमॅकेतर्फे दि. १६ जानेवारी रोजी पं. मल्लिकार्जुन मन्सुर यांचे पुत्र पं. राजशेखर मन्सुर यांनी गायन सादर केले.

मराठी माध्यमाच्या इ. ८वीच्या विद्यार्थ्यांचे दीक्षाग्रहण संपन्न झाले. 'चिन्मय मिशनचे ब्रह्मचारी शैलेश चैतन्य' यांनी विद्यार्थ्यांना आशीर्वाद दिले. दि. १७जानेवारी रोजी इंग्रजी माध्यमाचे दीक्षाग्रहण संपन्न झाले. आर्य समाजाचे उपासक स्वामी नागमानंद सरस्वती यांनी विद्यार्थ्यांना आशीर्वाद दिले.

दि.२४ जानेवारी रोजी क्रीडाकुलचा वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ मराठा चेंबर ऑफ कॉमर्स अँड ॲग्रिकल्चरचे मॅनेजिंग डायरेक्टर मा.श्री. अनंत सरदेशमुख यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाला. यावेळेस ८१ राज्यस्तरीय पदकविजेत्या व ३१ राष्ट्रीय सहभागी खेळाडूंचे गौरव करण्यात आले.

श्रीकृष्ण या विषयावर आधारित बालभवनच्या विद्यार्थ्यांचे स्नेहसंमेलन पिंपरी चिंचवड प्रेक्षागृहात भरवण्यात आले.

दि. १३ फेब्रुवारी ते १८ फेब्रुवारी पर्यंत इ. ९वी च्या विद्यार्थ्यांनी दासबोध पारायण केले. दासनवमीच्या दिवशी पारायणाची सांगता

झाली. त्याचदिवशी प्रतिज्ञाग्रहणाचा संस्कार विद्यार्थ्यांवर करण्यात आला.

दि. २६ फेब्रुवारी रोजी सावरकर पुण्यतिथी निमित्त श्री.पराग ठाकूर हे 'सावरकरांचा विलक्षण जीवन प्रवास' या विषयावर विद्यार्थ्यांशी बोलले. याच दिवशी वार्षिक बक्षीस समारंभ झाला. विविध स्पर्धांतील सहभागी विद्यार्थ्यांना बक्षीसे देण्यात आली. लघुउद्योजक श्री. विनोद बन्सल व वक्ते श्री. पराग ठाकूर यांच्या हस्ते बक्षीस वितरण समारंभ झाला.

बालभवन विभागाने यंदा प्रथमच विद्यार्थ्यांसाठी वर्षारंभ व वर्षांत याची स्वतंत्र पोथी केली व त्यानुसार कार्यक्रमाचे आयोजन केले.

- **अन्य भेटी, दौरे**

स्पिकमॅके तर्फे नागालँड येथे आयोजित राष्ट्रीय संगीत सभेला सहा विद्यार्थी, एक संगीत शिक्षक व श्री. यशवंतराव लिमये जाऊन आले.

विद्यालयातील पाच विद्यार्थी व एक अध्यापक आणि अमेरिकेतील दोन अध्यापक तुळापूर येथे त्रिवेणी संगमावर पाण्याचे परीक्षण करण्याकरिता गेले होते. ''चार नद्या व एक जग'' आंतरराष्ट्रीय प्रकल्पाअंतर्गत पाण्याचे परीक्षण झाले.

दि. १० ऑक्टोबर रोजी फिजी येथील खेळाडूंनी शाळेला भेट दिली. भारताच्या संस्कृतीप्रमाणे त्यांचे मोठ्या उत्साहात स्वागत केले. भारत व फिजी या दोन देशांचा तुलनात्मक अभ्यास विद्यार्थ्यांनी सादर केला.

इंग्लंडमधील ब्लेसड् एडवर्ड स्कूलचे ७ विद्यार्थी व १ शिक्षक यांनी विद्यालयाला भेट दिली. ह्या विद्यार्थ्यांनी क्रीडाकुलच्या विद्यार्थ्यांना रग्बी खेळ शिकविला व त्यांच्याकडून मल्लखांब व दोरावरील मल्लखांब शिकून घेतले.

- **सत्कार, पुरस्कार**

कु. वसुंधरा भास्कर रिकामे इ. १० वी मराठी माध्यम हिला संत तुकाराम महाराज प्रतिष्ठानतर्फे दिला जाणारा 'महिला शाहीर पुरस्कार' दि. २३ मार्च रोजी मिळाला.

दि. १ मे रोजी सौ. सुमनताई शेणॉय यांना Rank and Bolt पुरस्काराचे जिल्हास्तरीय उपविजेतेपद मिळाले. शाळेच्या कु.मैत्रेयी वैरागकर हिला राज्यस्तरीय पुरस्कार देण्यात आला. मुंबई विद्यापिठाचे उपकुलगुरु कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते.

- **माजी विद्यार्थी संघटन**

दि. ७ फेब्रुवारी रोजी संध्याकाळी माजी विद्यार्थ्यांसाठी प्रतिज्ञा स्मरण दिन झाला. इ. ११वी तील १२ विद्यार्थी उपस्थित होते. त्यांनी त्याबद्दल आपल्या प्रतिक्रिया, विचार आणि भविष्यातील कार्यक्रम सांगितले.

~~~


**☆ प्रबोधिनीचे संस्थापक कै. वि. वि. तथा आप्पासाहेब पेंडसे ☆**

**यांच्या चिंतन पुस्तिका**

- उपासनेला दृढ चालवावे
- देशाचा कायापालट करणारे शिक्षण
- जन सुसंघटनार्थ विणावे
- राष्ट्रार्थ भव्य कृति काही

**यांची ग्रंथसंपदा**

- राष्ट्रद्रष्टे विवेकानंद
- विवेकानंद - कन्या भगिनी निवेदिता
- हरिसिंह नलुआ
- विवेकानंदांचा राष्ट्रधर्म
- प्रेरक कथा
- राष्ट्रदेवो भव

★ **चरित्र ग्रंथ : ज्ञान प्रबोधिनीचे संस्थापक - वि. वि. पेंडसे**

लेखिका - स्वर्णलता भिशीकर
~~~

# संघटन प्रभाग

## युवक विभाग

दि. १३ एप्रिल रोजी युवक विभागाचा प्रतिज्ञा ग्रहणाचा कार्यक्रम झाला. या कार्यक्रमात ५४ जणांनी प्रथम प्रतिज्ञा तर ४ जणांनी द्वितीय प्रतिज्ञा घेतली. कार्यक्रमाला सुमारे २५० जण उपस्थित होते.

पुण्यातील २५ युवक कार्यकर्त्यांचे 'हिंदू जीवन दृष्टी अभ्यास शिबिर' दि. २६ जून ते २९ जून रोजी केडगांव बेट येथील नारायण महाराज आश्रमात पार पडले. 'वाटा आपुल्या हिताच्या' या पुस्तकांतील प्रश्नांचे वाचन व त्या अनुरोधाने गटचर्चा झाल्या. पुढील विषयांवर व्याख्याने झाली ह्ह १) कॉर्पोरेट गव्हर्नन्स व ग्लोबलायझेशन व त्यावरील भारतीय उत्तरे - मा. महेश आठवले, २) अर्थकारणामागील भारतीय जीवनदृष्टी - मा. मोहनराव गुजराथी, ३) प्रसार माध्यमे व भारतीय लोकमानस - श्री. संजय तांबट, ४) विकासाची मॉडेल्स् व भारतीय जीवनदृष्टी - मा. सुभाषराव देशपांडे.

यावर्षी गणेशोत्सवामध्ये विविध उपक्रम राबविले गेले. आठ सार्वजनिक गणेश मंडळांमध्ये गणेश प्रतिष्ठापनेची उपासना झाली. पंचवीस मंडळांसमोर बर्चीनृत्याची स्थिर प्रात्यक्षिके झाली. गणेश प्रतिष्ठापनेच्या दिवशी पाच मंडळांच्या मिरवणुकांमध्ये सहभाग होता. गणेश विसर्जनाच्या मिरवणुकीत पाचव्या व सातव्या दिवशी सांगली येथे व दहाव्या दिवशी पाच मंडळां बरोबर सहभाग होता.

महाविद्यालयीन गटातील एकूण २२५ युवक बर्चीनृत्य गट व वाद्यगटात सहभागी झाले होते. ज्ञान प्रबोधिनीच्या गणेश विसर्जन मिरवणुकीमध्ये बर्चीनृत्याचे आठ गट सहभागी झाले होते. यामध्ये साधारणतः ६०० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

सार्थ अथर्वशीर्ष पठण यामध्ये साधारणतः १०० विद्यार्थी सहभागी झाले होते. एकूण ३२ मंडळांसमोर पठण झाले.

मेळघाट, नंदुरबार व ठाणे ह्या वनवासी जिल्ह्यांमध्ये कुपोषणाच्या अभ्यासासाठी व ओरिसामध्ये हिंदू-ख्रिश्चन दंगलींच्या पार्श्वभूमीवर युवक कार्यकर्त्यांचे चार गट अभ्यासासाठी गेले होते. संस्था, संघटना व कार्यकर्त्यांच्या कामाच्या पद्धती, प्रेरणा व समाजावरचा त्याचा परिणाम ह्या सर्वांविषयी काही चिंतन ह्या निमित्ताने झाले. दि. १८ जानेवारी रोजी सर्व दौऱ्यांच्या निवेदनांचा कार्यक्रम झाला.

दि. ८ फेब्रुवारी रोजी युवक विभागाची क्रीडा प्रात्यक्षिके जोषात पार पडली. ३५० युवक व ५१ मार्गदर्शकांच्या गटाने १६ क्रीडा प्रकार सादर केले. त्यामध्ये कबड्डी, खो-खो, व्हॉलीबॉल सारख्या प्रचलित खेळांबरोबर काठी नृत्य, सायकल कसरतींसारखे उत्कंठावर्धक खेळ व दलांनीच शोधलेल्या बाटली-रग्बी सारख्या क्रीडा प्रकारांचा समावेश होता. विज्ञान दलाने वैज्ञानिक प्रयोग व महाविद्यालयीन युवकांच्या 'आपत्ती व्यवस्थापन'च्या गटाने काही नवीन विषयांची ओळख करून दिली. त्यासाठी दृक्-श्राव्य माध्यमांचा चांगला वापर करण्यात आला.

~~~

## युवती विभाग

दि. ४ मे रोजी युवती विभागाचा वर्षान्त उपासना व प्रतिज्ञा ग्रहणाचा कार्यक्रम झाला. दहा युवतींनी प्रथम व एका युवतीने द्वितीय प्रतिज्ञा घेतली.

दि. २३ ते २७ जुलै या कालावधीत युवती विभाग कार्यालयात दैनंदिन उपासना, पद्य/ केन उपनिषद वाचन व त्यावर चर्चा असा कार्यक्रम झाला. या कार्यक्रमात युवती विभाग, संवादिनी व जिजामाता दल या सर्वांमधील एकूण ५० जणी सहभागी झाल्या.

कै. आप्पांच्या स्मरण-दिनाच्या निमित्ताने 'विकसता विकसता विकसावे' हे पद्य समजून घेताना कै. आप्पांचा परिचय सर्वांनी करून घेतला. पद्य गायनाच्या कार्यक्रमामधून केलेल्या निवेदनाच्या द्वारे ज्ञान प्रबोधिनीने शिवगंगा गुंजवणी खोऱ्यात केलेल्या ग्रामविकसन कार्याचा परिचय नवीन युवतींना करून दिला गेला.

चाकण, वेल्हे व इस्लामपूर या ठिकाणी विस्तार शिबिरे झाली. यंदा इ. १० वी ची परीक्षा दिलेल्या ११ युवतींनी ही शिबिरे घेतली. या शिबिरांमध्ये १२५ युवती सहभागी झाल्या होत्या.

पुण्यातील गणेशोत्सवात युवती विभागाचा ८५ युवतींचा वाद्यवृंद, ज्ञान प्रबोधिनी प्रशालेतील इ. ७ वी तील मुलींचा लेझीमचा गट, प्रशालेतील इ. ८वी ते १० वी चे तीन गट, महाविद्यालयीन युवतींचा एक व सरस्वती मंदिर आणि रामचंद्र राठी विद्यालयातील युवती मिळून एक गट असे बर्चीनृत्याचे पाच गट सहभागी झाले होते.

गणेशोत्सवाच्या काळात पुण्यातील विविध भागात ६ मिरवणुका व ७ प्रात्यक्षिके झाली.

~~~

# स्त्री शक्ती प्रबोधन

• **मासिक बैठक**

### संवादिनी, पुणे

श्याम बेनेगल दिग्दर्शित 'हरीभरी' ही चित्रपट्टिका पाहिली.

एप्रिल महिन्यात मासिक बैठकीत 'वाढत्या वयाचा स्वीकार' या विषयावर मा. सुजलताई वाटवे यांनी सर्व उपस्थितांबरोबर चर्चात्मक संवाद साधला. ३५ ते ४० जणी ह्या कार्यक्रमात उपस्थित होत्या.

मासिक बैठक दि. २० जून रोजी झाली. ह्या शैक्षणिक वर्षीची ही पहिली बैठक. ह्या बैठकीत प्रबोधिनीच्या ज्येष्ठ कार्यकर्त्या मा. स्वर्णलता भिशीकर आल्या होत्या. त्यांनी 'उपासनेतून आत्मविश्वास' या विषयावर माहिती दिली.

दि. २२ ऑगस्ट रोजी संवादिनी सदस्या नीलिमा रास्ते यांनी 'रामदास स्वामींनी केलेला मनुष्यस्वभावाचा अभ्यास' ह्याबद्दल माहिती दिली.

दि. १५ सप्टेंबर रोजी पुणे येथे डॉ. संगीता जोग-कोहली यांचे 'विविध निदान चाचण्या आणि आपण' ह्यावर भाषण व चर्चा झाली.

दि. २१ नोव्हेंबरला पुणे येथे साप्ताहिक सकाळ दिवाळी अंकातील 'जगण्याविषयी बोलू काही' ह्या लेखाचे वाचन व त्यावर सविस्तर चर्चा झाली.

दि. १९ डिसेंबर रोजी डॉ. अशोकराव कुकडे यांचे 'राष्ट्रवाद व दहशतवाद' या विषयावर व्याख्यान झाले.

दि. २० फेब्रुवारी रोजी संवादिनीच्याच एक सदस्या श्रीमती शुभा रुद्र वक्त्या म्हणून आल्या होत्या. त्या स्वतः उत्तम चित्रकार आहेत. त्यांनी संवादिनी गटाला शुभेच्छा पत्रे, पाकीटे व त्याची सजावट करायला शिकविले.

### संवादिनी, डोंबिवली

ऑगस्ट मध्ये अनुराधा प्रभुदेसाई यांनी 'कारगील भेटीचे अनुभवकथन' केले

डोंबिवली गटाचा तिसरा वर्धापन दिन दि. १३ ऑक्टोबर रोजी झाला. त्यावेळी मा. बागेश्रीताई पोंक्षे यांचे अनुभवकथन झाले.

दि. १४ नोव्हेंबरला 'दासबोधातील व्यवस्थापन' या विषयावर श्री. केतन बेंद्रे यांचे व्याख्यान झाले. लेखिका वीणा गवाणकर यांच्याशी त्यांच्या लेखनाच्या अनुषंगाने मनमोकळ्या गप्पा झाल्या.

### संवादिनी, बोरिवली / गिरगाव

श्री. सारंग गोसावी यांनी 'ज्ञान प्रबोधिनीचे काश्मिर मधील कार्य' हा विषय मांडला. गिरगाव येथे 'निसर्ग व श्रावण' ह्यावर गटचर्चा झाली.

दि. १७ नोव्हेंबरला 'परदेशी गेलेल्या मुलांचे पालक' ह्यावर गटचर्चा झाली.

दि. २० फेब्रुवारी रोजी 'मानसिक ताणतणाव व त्यावरील उपाय योजना' ह्या विषयावर बोलण्यासाठी मानसतज्ज्ञ तनया नलावडे आल्या होत्या.

### संवादिनी, हुपरी

हुपरी येथे सुधाताई सांगवडेकरांच्या पुढाकाराने संवादिनीची प्राथमिक बैठक झाली. 'ओल्या कचऱ्याचे व्यवस्थापन' ह्यावर पर्यावरण जागृती मंचाचे श्री. रवींद्र सावंत यांचे व्याख्यान व प्रात्यक्षिक झाले.

दि. २५ जानेवारी रोजी झालेल्या मासिक बैठकीमध्ये 'हिंदू-संस्कृती मधील सणवार' या विषयावर चर्चा झाली. दि. १५ फेब्रुवारी रोजी झालेल्या बैठकीमध्ये पुण्याच्या अनुपमा जोशी-राव उपस्थित होत्या.

• **'उमलत्या वयाशी जुळवून घेताना' - कार्यशाळा**

स्त्री शक्ती प्रबोधन या उद्दिष्ट दिशेने काम करणाऱ्या संवादिनी (पुणे) गटाने गेली काही वर्षे विविध ठिकाणी शालेय विद्यार्थिनींसाठी 'उमलत्या वयाशी जुळवून घेताना' या विषयावर अनेक कार्यशाळा घेतल्या. वृत्तान्त वर्षातही हा महत्त्वपूर्ण उपक्रम चालू होता.

अक्षरनंदन शाळेमध्ये (पुणे) दि. २५, २६, २७ जून रोजी अनिता गुर्जर, दीपा शेंडे व साधना सेठिया ह्यांनी इ. ९वी च्या विद्यार्थ्यांसाठी कार्यशाळा घेतली.

जुलै ते ऑगस्टमध्ये प्रेरणा विद्यालय, पुणे, लातूर, सांगली (कांतिलाल शहा विद्यालय), रत्नागिरी आणि मंचर येथे महाविद्यालयीन गटासाठी कार्यशाळा झाली.

दि. १७ नोव्हेंबर रोजी शिरवळ येथील शाळेत इ. ९ वी च्या विद्यार्थ्यांसाठी कार्यशाळा घेतली गेली.

दि. १७ नोव्हेंबर रोजी शिरवळ येथे ज्ञान संवर्धिनी शाळेतील इ. १०वी च्या विद्यार्थ्यांसाठी, तसेच दि. ११ डिसेंबर रोजी जुन्नर येथे शंकरराव बुट्टे पाटील प्रशालेतील विद्यार्थ्यांसाठी, दि. २९ व ३० डिसेंबर रोजी विद्या विकास विद्यालय येथे इ. ९वी विद्यार्थी - विद्यार्थिनींसाठी व दि. १२ व १३ जानेवारी रोजी विवेकानंद शैक्षणिक संस्था, लोणी काळभोर इथे इ. ९ वी व १० वीच्या विद्यार्थिनींसाठी कार्यशाळा झाली.

### प्रशिक्षक प्रशिक्षण

'उमलत्या वयाशी जुळवून घेताना....'चे प्रशिक्षक प्रशिक्षण शिबिर दि. २ व ३ जुलै रोजी झाले. ह्या शिबिरात काही डॉक्टर्स, शाळांमधील

शिक्षक, काही सामाजिक कार्यकर्ते (MSW) असे ४३ जण सहभागी झाले होते.

दि. २१ डिसेंबर रोजी स्वरूपवर्धिनी येथील दाईंसाठी 'सहजीवनाच्या उंबरठ्यावर' या विषयावरील वर्ग झाला.

दि. २३ व २४ डिसेंबर रोजी शालेय मानसशास्त्र पदव्युत्तर पदविका विद्यार्थी-विद्यार्थिनींचा तसेच दि. १० व ११ जानेवारी रोजी स्त्री जागरण मंच, औरंगाबाद येथेही प्रशिक्षणाचा कार्यक्रम झाला.

### *बहर जोपासताना ...*

दि. २० एप्रिल रोजी मुलांच्या वाढत्या वयात पालकांनी मुलांशी कसा संवाद साधावा, या विषयावर 'बहर जोपासताना' ही पालकांसाठी कार्यशाळा आयोजित केली होती. ६० पालकांनी नावनोंदणी केली.

### • पालवी गट

दि. १८ व २५ सप्टेंबरला गिरगाव येथील नूतन समर्थ विद्यालयातील ३५ मुलांसाठी नीलिमाताई रास्ते व इतर पाच संवादिनी सदस्यांनी 'गंमत अभ्यास शिबिर' घेतले.

नूतन समर्थ मंदिरातील विद्यार्थ्यांसाठी (इ. ५वी ते ८ वी) एक अभ्यास शिबिर घेतले. ह्यात इंग्लिश व भूगोल या विषयांसाठी काही खेळांमधून मार्गदर्शन केले गेले.

ज्ञानदा प्रशालेतील इ. ७वी ते ९वी च्या विद्यार्थ्यांसाठी दि. ३० नोव्हेंबर रोजी विज्ञान शिबिर घेतले. पालवी गटाच्या ज्ञानदा प्रशालेतील मुलांसाठी दोन तासिका झाल्या.

दि. २४ जानेवारी रोजी शारदा विद्यामंदिरातील विद्यार्थ्यांसाठी गंमत शिबिर घेतले. यामध्ये१२० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. हस्तव्यवसाय, तसेच गाणी, गोष्टी व शर्यती घेतल्या.

पालवी गटातील सदस्यांनी दि. ७ व २१ फेब्रुवारी रोजी शारदा विद्या मंदिर - आपटे रोड, पुणे येथील इ. ४थीच्या १७० विद्यार्थ्यांसाठी भूगोल शिबिर घेतले. ह्यात विद्यार्थ्यांना आराखडा काढणे, भूरूपांची प्रारूपे करणे, महाराष्ट्रातील महत्त्वाची ठिकाणे नकाशावर दाखविणे इ. शिकविले.

### • गप्पा कट्टा

दि. ४ एप्रिल रोजी 'गप्पा कट्टा' अंतर्गत 'मान-अपमान' ह्या विषयावर गप्पा झाल्या. व्यक्तिगत गोष्टींपासून ते राष्ट्राच्या मान-अपमानापर्यंत अनेक मुद्दे आले.

दि. ६ जून रोजी ह्या उपक्रमाचा उपयोग लेखन सुधारण्यासाठी झाल्याचे जाणवले.

दि. ४ जुलै रोजी चू डरलिश (माझे अवकाश) ह्या विषयावर चर्चा झाली. ऑगस्ट महिन्यात - उत्सुकता, सप्टेंबर - संरक्षण, डिसेंबर - निर्णायक क्षण, जानेवारी ०९ मध्ये आठवणीतल्या कविता, मार्च मध्ये मेळावा, असे अनेक विषय चर्चिले गेले.

### • संस्था भेट

दि. २४ एप्रिल रोजी 'श्रीवत्स केंद्र', पुणे येथे सदस्यांची संस्था भेट झाली.

दि. १३ मार्च रोजी नारायणगाव येथील शेळी सुधार संस्था, खोडद येथील दुर्बीण, सैनिक प्रशिक्षण संस्था व वाईनरी या ठिकाणी संवादिनीच्या १५ सदस्या भेट देऊन आल्या. नारायणगाव येथेच राहणाऱ्या एक संवादिनी सदस्या डॉ. रोहिणी विद्वांस ह्यांनी ह्या सर्व कार्यक्रमाची व्यवस्था पाहिली.

### • 'समतोल' त्रैमासिक

'समतोल २००८' ह्या बाराव्या वर्षाच्या दिवाळी अंकाचे प्रकाशन श्री. विजय कुवळेकर (ज्येष्ठ पत्रकार व माहिती आयुक्त, महाराष्ट्र राज्य) ह्यांच्या हस्ते दि. १८ ऑक्टोबर रोजी झाले. ह्या वेळी काही विदेशी कवयित्रींच्या कवितांच्या मराठी भावानुवादाचे सादरीकरण झाले. 'सीमेपलीकडील मैत्रिणी' हा अंकाचा मुख्य सूत्रविषय होता.

समतोल वर्ष १२ : अंक ४ हा 'राज्य कायद्याचे' असा सूत्रविषय घेऊन स्त्रियांसाठीच्या विशेष कायद्यांची माहिती देणारा अंक प्रकाशित झाला.

एप्रिलमधील समतोल वर्ष १३, अंक १ हा 'चित्रपट आणि सामाजिक आशय' विशेषांक होता. वेगळा विषय आणि आकर्षक मुखपृष्ठ हे याचे वैशिष्ट्य म्हणता येईल.

### • अन्य

यंदा प्रथमच 'संवादिनी' गटाने कै. मंगलाबाई चितळे स्मृति व्याख्यानमालेत संत्रिकेबरोबर सक्रिय सहभाग घेतला होता. ह्या तीन दिवसांच्या व्याख्यानमालेत - पहिल्या दिवशी 'शारदामाता' विषयावर मा. उषाताई कुलकर्णींनी संगीत-गद्य सादरीकरण केले. दुसऱ्या दिवशी 'स्त्री-पुरुष जैविक भेद व परस्परपूरकता' ह्या विषयावर मा. प्रा. राजीव साने ह्यांनी माहितीपूर्ण विवेचन केले. तिसऱ्या दिवशी 'अहिल्याबाई होळकर चरित्र' ह्या विषयावर ह. भ. प. ताराबाई देशपांडे ह्यांनी कीर्तन केले.

### • इतर संस्था / संघटनांच्या कामातील योगदान

भारतीय मजदूर संघाच्या महिला सदस्यांसाठी (सुमारे ४०) प्रा. संगीता कुलकर्णी व प्रा. अनघा अडोणी यांनी तीन दिवसांचा (१६ ते १८ ऑगस्ट) एक प्रशिक्षण वर्ग घेतला.

लैंगिकता प्रशिक्षण गटातील १७ जणींनी 'राष्ट्रीय शिक्षा-संस्कृती उत्थान न्यास' तर्फे आयोजित परिसंवादात सहभाग घेतला होता. 'लैंगिकता शिक्षण' असा विषय परिसंवादात मांडला गेला. वा. अनघा लवळेकरांनी निवेदन केले.

किशोरी विकास प्रशिक्षक -प्रशिक्षण, औरंगाबाद येथे दि. १४ व १५ फेब्रुवारी रोजी आयोजित केले होते. श्रीमती सुजाता होनप व श्रीमती संगीता कुलकर्णी ह्यांनी ह्या शिबिरात विशेष मार्गदर्शन केले.

- **विशेष कार्यशाळा / बैठकी / प्रशिक्षणे / मेळावे / अभ्यास दौरे**

संवादिनीतर्फे योजलेल्या 'विवेकनिष्ठ विचारपद्धती' वरील कार्यशाळेत ३६ जणींनी सहभाग घेतला.

दि. २८ जानेवारी रोजी वर्धापनदिनानिमित्त पुणे विद्यापीठात स्नेहमेळावा घेतला गेला. पूर्ण दिवसाच्या या मेळाव्यात सुमारे ६० सदस्यांनी भाग घेतला. अनेक छोटे-छोटे कृतिखेळ, विविध प्रश्नांवर गटचर्चा तसेच 'कृतिशील संवादिनी'पुरस्काराचे वितरण (अंजली राईलकर व जयश्री हर्षे यांना) यावेळी झाले. 'हिंदु सोसायटी ऑफ ओटावा'चे श्री. दत्ताजी सायगावकर तसेच श्रीमती माधुरी सायगावकर ह्यांची विशेष उपस्थिती ह्या कार्यक्रमाला होती.

**बोरिवली** येथे दि. ३१ जानेवारी रोजी मातृभूमी पूजनाचा कार्यक्रम झाला. पुण्याहून निलीमा रास्ते व सुषमा निसळ ह्या सदस्या गेल्या होत्या.

**शारदोत्सव-** जिजामाता दलाने दि. १ ते ३ ऑक्टोबर या दिवसात संध्याकाळी ४ ते ६ या वेळात कार्यक्रम केले. 'आर्थिक विकासाची वाटचाल' या विषयावर प्रा. सुवर्णाताई गोखले यांचे दोन दिवस व्याख्यान झाले व चर्चाही झाली.

उपनिषद अभ्यासगटाने दि. ५ ऑक्टोबरला सौ. मृदुलाताई पाठक यांचे ईश उपनिषद यावर व्याख्यान ऐकले.

दि. १२ व १३ जून रोजी वार्षिक नियोजनासाठी एक प्रदीर्घ बैठक झाली. कामशेत मधील निष्ठा केंद्र येथे 'संवादिनी' सदस्या जमल्या होत्या. ह्यामध्ये मागील वर्षाचा आढावा, 'संवादिनी' म्हणून इतर ठिकाणी वावरताना काय अनुभव येतात ह्याबद्दल चर्चा तसेच विविध खेळ असे कार्यक्रम योजले होते. मा. महेंद्र सेठिया ह्यांनी 'कार्यकर्ता कसा असावा' ह्यावर त्यांचे अनुभव व विचार मांडले. दुसऱ्या दिवशीच्या सत्रात मा. संचालकांनी 'व्यक्तीमधील चांगुलपणा' या विषयावर भाष्य केले.

'संवादिनी' गटातील ११ जणींनी पथनाट्य स्पर्धेमध्ये सहभाग घेतला होता. ही स्पर्धा लायन्स क्लब व इन्सानियत संस्था यांनी एकत्रितपणे आयोजित केली होती. HIV एड्स् विषयक जागरणासाठी ही स्पर्धा होती. संवादिनी गटाला तृतीय क्रमांक मिळाला व रु. ५,०००/- रोख व मानचिन्ह (ढाल) असे पारितोषिक मिळाले.

- **संवादिनी सदस्यांचा अभ्यास दौरा**

दि. २ नोव्हेंबर ते ९ नोव्हेंबर या कालावधीत 'संवादिनी'सदस्यांचा अभ्यास दौरा अहमदाबाद येथे आयोजित केला होता. त्यामध्ये २७ जणी सहभागी झाल्या होत्या. या दौऱ्यात सदस्यांनी विविध मान्यवरांच्या भेटी घेतल्या. त्यात सेवा बँकेच्या कार्याध्यक्षा श्रीमती जयश्रीबेन व्यास, 'संस्कारधाम' (लक्ष्मणराव इनामदार विद्यापीठ) या 'गुरुकुल' धर्तीवर चालणाऱ्या संस्थेचे पदाधिकारी, National Dairy Development Board (NDDB) व Indian Rural Management Academy (IRMA) चे अधिकारी, आणंद कृषी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. वार्ष्णेयजी, विद्याभारतीचे हरीशजी व्यास हे होते. त्याच बरोबर 'गुजराथ' चं दर्शन तिथल्या सर्वसामान्य माणसाच्या नजरेतून व्हावं, म्हणून शिक्षण, शासकीय कार्यालय कामकाज, आरोग्य सेवा, सांस्कृतिक ठेवा, वृत्तपत्र व अन्य माध्यमे, पोलिस यंत्रणा, विद्युत यंत्रणा असे विषय ठरवून गटशः जाऊन लोकांच्या मुक्त मुलाखती घेतल्या. माननीय मुख्यमंत्री नरेंद्रजी मोदी यांचीही अर्धा तास भेट झाली. गुजरातच्या संसाधने व पायाभूत रचनांमधील झपाट्याने होणाऱ्या प्रगतीमागील कारणे त्यांनी सविस्तर सांगितली.

ह्या शिवाय गुजरातची सांस्कृतिक ओळख सांगणाऱ्या त्रिदेव मंदिर, अक्षरधाम सारखी मंदिरे, काही ऐतिहासिक स्थळे यांनाही भेटी दिल्या. सरदार पटेल यांचे स्मारक व त्यांची मूळ वास्तू अशा संस्मरणीय राष्ट्रीय ठेवा असलेल्या स्थळांचं दर्शन घेतलं.

~~~


## ☆ समतोल ☆

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| • संपादक | : | अनघा लवळेकर | • मूल्य | : | २०/- |
| • कार्यकारी संपादन साहाय्य | : | विद्या साने, आशा बापट, मंजुषा बेहेरे सुषमा निसळ, अनुराधा देशपांडे | • वार्षिक मूल्य (दिवाळी अंकासह) | : | १३०/- |
| • संपर्क पत्ता | : | स्त्री-शक्ती प्रबोधन ज्ञान प्रबोधिनी, ५१०, सदाशिव पेठ, पुणे ४११०३० | • द्वैवार्षिक मूल्य | : | २६०/- |
| | | | • त्रैवार्षिक मूल्य | : | ३८०/- |
~~~

# उपकेंद्रे व विस्तार केंद्रे

## • अंबाजोगाई उपकेंद्र

**अभ्यास शिबिर** - दि. १० ते १२ मे या दरम्यान अंबाजोगाई केंद्रातील इ. १० वी च्या पुढील सदस्यांचे 'महर्षी दयानंद' या विषयावर अनिवासी अभ्यास शिबिर आयोजित करण्यात आले होते. सार्थ उपासना, एक व्याख्यान, लेखन, वाचन व चर्चा, सार्थ अभंग व पद्य गायन, झालेल्या चर्चेचे निवेदन आणि शंका-समाधान असे एकूण दिवसभराचे शिबिराचे नियोजन होते. शिबिरात व्याख्यान सत्रामध्ये मा. गिरीशरावांनी 'प्रबोधिनीचे पथदर्शक राष्ट्रसंत' आणि 'योगी की आत्मकथा' या पुस्तकातील 'महर्षी दयानंदांच्या आयुष्यातील काही महत्त्वाच्या घटना' तर श्री. अभिजित जोंधळे यांनी महर्षी दयानंदांचे चरित्र सांगितले. वाचन सत्रामध्ये 'दयानंद काय म्हणाले ?' या तयार होणाऱ्या नवीन पुस्तिकेतील 'सत्यार्थ प्रकाश' मधील निवडक दहा समुल्लासांचे चार गटांमध्ये प्रकट वाचन व त्यावर चर्चा केली. शिबिरात ३३ जण सर्व दिवस उपस्थित होते.

दि. ३ ऑगस्ट रोजी सकाळी ६ वा. खोलेश्वर महाविद्यालयामध्ये ज्ञान प्रबोधिनीचे सर्व कार्यकर्ते व प्रबोध कुटुंबीय, या सुमारे २५० जणांचा मिळून वर्षारंभ उपासनेचा कार्यक्रम झाला. दत्तात्रय उपासना केंद्र, रामदास उपासना केंद्र, दयानंद उपासना केंद्र आणि अक्षरशिल्प उपासना केंद्र येथे वर्षारंभ उपासना स्वतंत्रपणे झाली. दि. ३ व ४ ऑगस्ट रोजी मा. संचालक अंबाजोगाईत निवासी होते. शेपवाडी उपासना केंद्रातील ५४ मुलांची निसर्ग सहल नागझरी परिसरात दि.३१ ऑगस्ट रोजी काढण्यात आली होती.

श्री. आनंद देशमुख, चि. अविनाश अघोर, कु. ऐश्वर्या बावचीकर व डॉ. गोपाळ चौसाळकर यांनी आपापल्या निवासस्थानी मातृभूमी पूजनाचे कार्यक्रम योजले होते. अक्षरशिल्प उपासना केंद्रावरही मातृभूमी पूजनाचा कार्यक्रम पार पडला. सप्टेंबर महिन्यामध्ये ७ ठिकाणी मातृभूमी पूजन घेण्यात आले. या कार्यक्रमांसाठी प्रत्येकी २० ते ४५ जणांची उपस्थिती होती.

दि. ३ सप्टेंबर रोजी कार्यकर्ते व निमंत्रित अशा ६० जणांच्या उपस्थितीत श्री. व सौ. चिंतामणराव गोस्वामी यांच्या हस्ते गणेश प्रतिष्ठापना पूजा झाली.

दि. ४ सप्टेंबर रोजी श्री. प्रसाद चिक्षे यांचे 'इस्त्राईल अभ्यास दौरा' या विषयावरील व्याख्यान झाले. दि. ५ सप्टेंबर रोजी श्री. अभिजित देशपांडे यांचे 'इंग्रजी साहित्यातील भारतीय साहित्यिकांचे योगदान' या विषयावरील व्याख्यान झाले. गणेश विसर्जन मिरवणुकीसाठी अक्षय सेवा प्रतिष्ठानचा 'शांतता व शिस्त' यासाठीचा पुरस्कार ज्ञान प्रबोधिनीला मिळाला.

**शिशुविहार** - दि. ११ सप्टेंबर रोजी स्व. सौ. शकुंतला जाधव यांच्या स्मृतिप्रित्यर्थ अंबाजोगाईमधील सर्व बालवाड्यांसाठी सामूहिक नृत्य स्पर्धा आयोजित केली होती. अंबाजोगाईतील सर्वच बालवाडी गटांनी या स्पर्धेला भरभरून प्रतिसाद दिला. या स्पर्धेतील प्रथम क्रमांकाचे पारितोषिक संस्कार बालवाडी व द्वितीय पारितोषिक योगेश्वरी बालक मंदिर यांनी पटकावले.

**माँ शारदा उपासना केंद्र** - ऑगस्ट महिन्यात विद्याव्रत संस्कार यासाठीचे वर्ग घेण्यास सुरुवात झाली. इ. ८ वी ते १०वीच्या मुलींचा सहभाग आहे. यात मा. संचालकांचे 'विद्याव्रत संस्कार म्हणजे काय ?' या विषयावर मार्गदर्शन झाले. सौ. मनीषा वैद्य यांनी डॉ. आयडा स्कडर यांचे चरित्र सांगितले.

दि. ३० सप्टेंबर रोजी शारदोत्सवाची सुरुवात झाली. विद्याव्रताच्या मुलींच्या गटाने ढोल-ताशांचे प्रात्यक्षिक सादर केले. ज्ञान प्रबोधिनीच्या गोविंद केंद्रावर शारदा मूर्तीची प्रतिष्ठापना करण्यात आली.

~~~

## • बोरिवली विस्तार केंद्र

बोरिवली केंद्राचे विद्याव्रत शिबिर दि. १३ ते १९ एप्रिल दरम्यान झाले. श्रीमती शीतलताई चितळे या प्रमुख संयोजिका होत्या.शिबिरात ४१ मुलांनी भाग घेतला होता. यात अग्निशमन दलाला भेट, नाटुकल्या, कृतिसत्र, मुलाखत, मार्गदर्शनपर सत्र इ. सत्रे झाली.

शाळांमध्ये विकासिका घेणाऱ्या कार्यकर्त्यांसाठी दि. १५ जून रोजी एक दिवसाची कार्यशाळा झाली. कार्यशाळेसाठी बोरिवलीतील ८, गिरगावातील १, बांद्रा येथील ४ तर डोंबिवलीतील ४ कार्यकर्त्या उपस्थित होत्या. विकासिका का घ्यायच्या, कशा घ्यायच्या, त्यांचे स्वरूप, पूर्वतयारी इ. बाबत सविस्तर मार्गदर्शन व चर्चा यावेळी झाली.

एप्रिल महिन्यात झालेल्या 'विद्याव्रत शिबिरा'तील विद्यार्थ्यांचा 'पाठपुरावा मेळावा' ही यावेळी झाला. या मेळाव्याला २२ विद्यार्थ्यांची उपस्थिती होती. कार्यशाळा आणि मेळावा या दोहोंत सहभागी झालेल्यांना श्री. महेंद्रभाई सेठिया यांचे मार्गदर्शन लाभले.

दि. १८ ते २० मे दरम्यान केंद्रातील सदस्यांचे बदलापूर येथे निवासी अभ्यास शिबिर झाले. या शिबिराला १२ कार्यकर्त्यांची उपस्थिती होती. निगडीचे मा. यशवंतराव लिमये, सौ. मधुरा लुंकड तसेच मा. संचालक व अभिजित एक्बोटे यांची पूर्ण वेळ उपस्थिती शिबिराला लाभली. या शिबिरात आप्पांच्या वैचारिक पुस्तकांचे व 'समाजाभिमुख उपासना - प्रकट चिंतन' या पुस्तिकेचे गटशः वाचन झाले.

~~~

## • डोंबिवली विस्तार केंद्र

डोंबिवली केंद्रावर गुढी पाडव्याच्या निमित्ताने 'वर्षारंभ उपासना' झाली. यावेळी ३२ कार्यकर्त्यांनी व्यक्तिगत संकल्प केले. यावेळी श्रीमती ज्योतीताई कर्वे यांनी उपासना सांगितली.

केंद्राचे 'कलास्वाद शिबिर' दि. १७ मे ते १९ मे दरम्यान बदलापूर येथे झाले. इ. ७ वी ते १० वी वयोगटातील एकूण ४३ जणांची उपस्थिती शिबिराला होती. यात कथ्थक नृत्य (सौ. ज्योतीताई शिधये), चित्रकला (श्री. विजयराज बोधनकर), चित्रपट रसस्वाद (श्री. अभिजीत देशपांडे), बासरीवादन (श्री. संतोष केसकर) यावर मार्गदर्शनपर सत्रे झाली. याखेरीज कथाकथन (श्री. एकनाथ आव्हाड), हा खेळ सावल्यांचा, जाहिरात निर्मिती व सादरीकरण, वादविवाद, सहल इ. सत्रे झाली.

दि. २७ जुलैला कार्यकर्ता बैठकीत सहविचार तंत्राबद्दल सविस्तर बोलणे झाले. सी.ए. च्या परीक्षेत भारतात पहिला आलेला मंदार दीक्षित आणि वृत्तपत्र विद्या परीक्षेत तिसऱ्या आल्याबद्दल सौ. अश्विनीताई मयेकर यांचा या प्रसंगी अनौपचारिक सत्कार झाला.

दि. ३ ऑगस्टला तिकोना येथे वर्षासहल झाली. या सहलीत १६ विद्यार्थी व १५ युवक आणि प्रौढ सदस्य उपस्थित होते.

दि. ३० मे ते १ जून या दरम्यान केंद्राचे अभ्यास शिबिर झाले. या शिबिराला २२ प्रौढ व युवक सदस्यांची उपस्थिती होती. डॉ. वनिताताई पटवर्धन यांची उपस्थिती शिबिराला लाभली. शिबिराच्या शेवटी प्रतिज्ञा ग्रहणाचा कार्यक्रम झाला. १० जणांनी प्रथम प्रतिज्ञा व सौ. श्रुतीताई फाटक यांनी द्वितीय प्रतिज्ञा घेतली.

विनोबांच्या 'मधुकर' व 'दीक्षा' या पुस्तकांतील निवडक उताऱ्यांचे वाचन व चर्चा, व्याख्याने, लेखन, पद्य, परिसंवाद इ. सत्रे झाली.

दि. २० डिसेंबरला डोंबिवली येथे संध्याकाळी प्रतिज्ञा ग्रहण समारंभ झाला. त्या आधी मध्यवर्ती सहविचार समितीची बैठक झाली. डोंबिवली केंद्राचा मागील १२ वर्षांचा आढावा घेतला गेला. १२ वर्षांच्या काळातील महत्त्वाच्या घडामोडींवरील १६ मिनिटांचा माहितीपट तेथील युवकांनी तयार केला. संध्याकाळी ३० कार्यकर्त्यांच्या उपस्थितीत प्रतिज्ञा ग्रहण समारंभ झाला. त्यामध्ये ४ युवती व ७ प्रौढ सदस्यांनी प्रतिज्ञा ग्रहण केली.

विद्याव्रत संस्कार शिबिराचे आयोजन करू इच्छिणाऱ्या १५ युवक व प्रौढ सदस्यांचे एक दिवसाचे प्रशिक्षण शिबिर झाले. त्याला श्री. विवेकराव पोंक्षे यांनी मार्गदर्शन केले. त्याच दिवशी सकाळी ३० कार्यकर्त्यांच्या उपस्थितीत डोंबिवली केंद्राचा वर्षांत समारंभ झाला.

~~~

## • सांगली विस्तार केंद्र

सांगली येथे प्रबोधिनीचे उपक्रम गेली अनेक वर्षे चालू आहेत. स्थानिक कार्यकर्त्यांचा एक चांगला गट तेथे उभा राहिला आहे. यंदाच्या वर्षी त्यात पुण्याहून मध्यवर्ती नेमणूक म्हणून श्री. अभिजित एकंबीकर या पूर्ण वेळ कार्यकर्त्याची भर पडली. तेथील कामामध्ये मुख्यतः दैनंदिन दल, साप्ताहिक प्रबोध वर्ग व साप्ताहिक उपासना असे उपक्रम चालतात. त्यात २५ चे वर विद्यार्थी नियमित तर ८० जण प्रासंगिक सहभागी होतात.

सांगलीमधील सुमारे १५ शाळांमध्ये आता प्रबोधिनीचे प्रासंगिक उपक्रम चालतात. यंदा विज्ञान स्पर्धेद्वारे १७०० विद्यार्थी संपर्कात आले. त्यापैकी ७५ जण विज्ञान शिबिराला उपस्थित राहिले.

दि. ३ व ४ जानेवारी रोजी सांगली येथे प्रतिज्ञा ग्रहण झाले. दोन युवक व पाच युवती यांनी प्रथम प्रतिज्ञा घेतली. दोन युवकांनी द्वितीय प्रतिज्ञा घेतली. त्याला १२५ जण उपस्थित होते. दुपारी त्या परिसरातील केंद्र प्रमुखांची बैठक झाली. त्या बैठकीला तासगाव, जत, हुपरी, इचलकरंजी येथून केंद्र प्रमुख आले होते. प्रतिज्ञित युवक युवतींच्या पालकांची बैठक झाली. त्याला २५ जण उपस्थित होते.

याशिवाय मातृभूमि पूजन, सायकल सहल, व्याख्याने असे उपक्रमही झाले. छात्र प्रबोधन मासिकाच्या निमित्ताने सांगली व कोल्हापूर जिल्ह्यातील वर्गणीदार विद्यार्थी, त्यांचे पालक व समाजातील सुमारे १५० मान्यवर यांचेशी श्री. एकंबीकर यांनी प्रत्यक्ष संपर्क साधला. तृतीय प्रतिज्ञित कार्यकर्त्याने सलग दोन वर्षे एखाद्या गावी जाऊन राहून काम वाढविण्याची परंपरा मध्यंतरी खंडित झाली होती, ती यंदा पुन्हा सुरू झाली, ही विशेष आनंदाची गोष्ट आहे.

~~~

## • इचलकरंजी उपक्रम केंद्र

हंगामी साखरशाळा तीन गावात चालविण्यात आल्या. विद्यार्थ्यांची सिंधुदुर्ग येथे सहल झाली. रोटरी क्लबने विविध उपक्रमांसाठी मदत देऊ केली. किशोरी विकास प्रकल्पात अभ्यासिका चालविण्यात आली. शालेय विद्यार्थ्यांचे पाच दिवसांचे शिबिर झाले, त्यास ५० उपस्थिती होती. संगणक साक्षरता हा उपक्रम सातत्याने चालू आहे.

दिवाळी अंकाचे वितरण, पसायदानद्वारे शाळा-कॉलेजांमध्ये जागृती व वरदार चुलीद्वारे इंधनबचतीबाबत जागृती असे उपक्रम झाले.

~~~
~~~

# नागरी वस्ती अभ्यास गट

पुणे शहराच्या विविध भागांमध्ये झोपडपट्ट्यांमध्ये राहाव्या लागणाऱ्या नागरिकांसाठी व विशेषतः त्यातील मुले व महिला यांच्यासाठी काही उपक्रम गेली ३ वर्षे चालू आहेत. प्रबोधिनीच्या स्त्री शक्ती प्रबोधनाच्या कार्याचा भाग म्हणून प्रा. हर्षाताई किर्वे हे काम सांभाळतात.

## महिला प्रशिक्षण वर्ग

मार्कन्डेयनगर, हडपसर येथे दि. २३ जानेवारीला सुरू झालेल्या वाखवस्तू प्रशिक्षण वर्गात १३ एप्रिलपर्यंत १२ महिलांचे प्रशिक्षण पूर्ण झाले. त्यामध्ये कीचेन, ५ इंची मॅट, कासव, महिरप, पायपुसणे, गोल पर्स व वेण्यांचे पाच प्रकार होते. या वर्गाचा समारोप झाला त्यावेळी मातृभूमी पूजनाचा कार्यक्रम झाला व श्री. माधवराव देशपांडे यांच्या हस्ते प्रमाणपत्र वितरणाचा कार्यक्रम झाला.

याच वस्तीत दि. ३ मे रोजी २५ मुलांच्या उपस्थितीत युवक विभागाने शिबिर घेतले.

दि. १२ एप्रिल ते १७ एप्रिल या कालावधीत तीन ठिकाणी मुला-मुलींसाठी विविध कला-कौशल्य प्रशिक्षण शिबिर झाले. शिबिरात प्रबोधिनी परिसरातील, मातंग वस्तीतील २०, हडपसर गोसावी वस्ती २०, मार्कन्डेयनगर ७० अशी एकूण ११० मुले-मुली सहभागी झाली होती. त्यामध्ये ओरिगामी, भेटकार्ड, बॉक्स, आकाशकंदील व कीचेनचे प्रकार, पद्य व गीते इ. गोष्टी मुले-मुली शिकली. हर्षाताई किर्वे यांच्याबरोबर १० जणांनी मिळून शिबिरे घेतली.

दि. १ मे ते ७ मे या काळात जुनी वडारवस्ती -पांडवनगर हेल्थ कॅम्प, नवरात्र उत्सव मित्र मंडळ यांच्या सहकार्याने ३० मुलींचे शिबिर झाले. त्यामध्ये उपासना, गटचर्चा व कौशल्य प्रशिक्षण झाले. पंधरा वर्षापुढील मुलींना या नंतर काय शिकावेसे वाटते, यावर चर्चा झाली.

दि. ४ मे रोजी युवक विभागाच्या कार्यकर्त्यांनी वडारवस्ती येथे मुलांसाठी वेगळे शिबिर घेतले. त्यामध्ये २५ मुले उपस्थित होती.

दि. ३१ मे रोजी ज्ञानेश्वर पादुका चौक येथील जुनी वडारवस्ती येथे जाऊन कल्याणीताई देव व अश्विनीताई ठाकर यांनी महिलांशी संवाद साधला. त्यांचा रोजचा आहार कसा आहे व ते रोजच्या जेवणात पौष्टिक अन्न किती खातात, याच्या माहितीसाठी त्यांच्याशी ओळख करून घेतली व फॉर्म भरून घेतले. त्याचबरोबर तेथील मुला-मुलींशी चर्चा, ओळख व काही बौद्धिक खेळ, पद्य घेतले. एकूण १० मुलं-मुली व ८ महिला उपस्थित होत्या. तेथील स्थानिक महिलांच्या मागणीवरून त्या ठिकाणी दि. ७ जून रोजी पनीर कसे करायचे ते शिकविले.

ऑगस्ट महिन्यात ज्ञानेश्वर पादुका चौका जवळील वडारवस्ती येथे संवादिनी गटातील तीन सदस्यांनी एका संशोधन प्रकल्पाच्या निमित्ताने ३ भेटींमधून १० महिलांच्या मुलाखती घेतल्या.

ज्ञान प्रबोधिनी प्रशालेतील इ. १०वी तील पाच मुलींनी मा. हर्षाताई किर्वे यांच्यासोबत वस्तीला भेट देऊन भविष्यवेध प्रकल्पासाठी संपूर्ण वस्तीची पाहणी केली.

स्नेहमेळावा व मातृभूमी पूजन कार्यक्रमांची एकत्र सांगड घालून ३ वस्त्यांमध्ये कार्यक्रम झाले.

संक्रांतीच्या दिवशी मातंगवस्तीमध्ये पूर्व शिबिरातील मुले-मुली व पालक अशा ४० जणांच्या गटासाठी हा कार्यक्रम झाला.दि. १८ जानेवारी रोजी दांडेकर वस्ती येथील प्रशिक्षण वर्गातील माजी विद्यार्थिनी, १८ युवती व पालकांसाठी हा कार्यक्रम झाला. दि. ३१ जानेवारी रोजी वडारवाडी, पांडवनगर, हेल्थ कॅम्प येथे नवरात्र उत्सव तरुण मंडळांच्या प्रांगणात ५० मुले व महिलांच्यासह कार्यक्रम झाला.

दि. १४ फेब्रुवारी पासून २ महिने हडपसर येथील गोसावी वस्तीत काम झाले. सुरवातीस महिलांचा मेळावा झाला, त्यामध्ये वाख वस्तूंचे प्रात्यक्षिक झाले, एकूण २२ महिला सहभागी झाल्या होत्या. वाखाच्या निवडक वस्तूंचे प्रशिक्षण काही महिलांनी घेतले. ३ महिलांनी पाय पुसणे उत्पादन करण्याचे काम सुरू केले आहे. ड्रीम इंडिया संस्थेच्या पुढाकाराने हा वर्ग घेतला. काम करण्याची गरज असणाऱ्या महिलांना शिवगंगा महिला उद्योगातून रोजगार उपलब्ध होणार आहे. सोलापूर, लातूर, बीड व नागालँड अशा विविध भागातून आलेल्या महिला व मुली यात सहभागी झाल्या होत्या.

मातंगवस्ती, सदाशिव पेठ येथील युवती मंडळाबरोबर त्यांच्या मागणीनुसार शिवणकला प्रशिक्षण वर्ग दि. १६ मार्च पासून सुरू झाला आहे. दहा मुलींनी वर्गाची मागणी केलेली होती. या सर्व मुली यापूर्वीच्या अनेक कार्यक्रमांमध्ये वस्तीमध्ये सहभागी झालेल्या आहेत.

दि. २३ फेब्रुवारी रोजी वडार वस्तीतील सहा मुली युवती विभागास झालेल्या संचालक भेटीस उपस्थित होत्या. युवतींनी केलेली क्रीडा प्रात्यक्षिके पाहून आपलेही असे खेळ घ्यावेत, अशी इच्छा वस्तीतील मुलींनी व्यक्त केली. बर्ची नृत्य मुलींना विशेष आवडले.

~~~

### ❖ आवाहन ❖

नागरवस्ती अभ्यासगटात सर्व वयोगटातील अभ्यासू व कृतिशील स्वयंसेवकांचे स्वागत आहे. अनेक प्रकारे आपण योगदान देऊ शकाल. आपला वेळ ह्नह्न ◆ साप्ताहिक, पाक्षिक, मासिक, १ दिवस पूर्ण ११ ते ६ ◆ वस्ती भेट – शनिवार ◆ अभ्यास गट बैठक – मंगळवार – ३ ते ५ ◆ अन्य वारही आपल्या सोयीनुसार.
~~~

# ग्रामविकसन प्रभाग

## • पाणलोट क्षेत्र विकास कामे

यावर्षी देगाव, नायगाव, साळवडे व करंदी (ता. भोर) या गावांमध्ये पाणलोट क्षेत्र विकास कार्यक्रमांतर्गत ९ शेततळी व २ माती बंधाऱ्याची कामे पूर्ण झाली. याशिवाय मांगदरी (ता. वेल्हे) येथे कोल्हापूर पद्धतीच्या सिमेंट बंधाऱ्याचे पायाचे बांधकाम पूर्ण झाले. कातवडी (ता. वेल्हे) येथील सिमेंट वळण बंधाऱ्याच्या दुरुस्तीचे काम ग्रामस्थांच्या श्रमदानातून पूर्ण करण्यात आले. या हंगामात एकूण सुमारे आठ लक्ष रुपयांची कामे पूर्ण करण्यात आली. त्यासाठी कपार्ट, नवी दिल्ली, यांचे अनुदान मिळाले.

## • ग्रामीण महिलांचे बचत गट

ज्ञान प्रबोधिनी च्या वतीने वेल्हे, भोर व हवेली तालुक्यांमधील ३२ गावांमध्ये २८२ बचतगट चालविले जातात. या गटांमधून ५१०० सभासद प्रबोधिनीशी जोडलेले आहेत.

दि. ९ मार्च रोजी शिवापूरला महिला दिनाचा कार्यक्रम झाला. त्यास १० गावातून ३५ बचत गटप्रमुख आल्या होत्या. The Art and Music Foundation च्या मनीषाताई कुलकर्णी यांनी व्यक्तिविकासाची कार्यशाळा घेतली.

## • गटप्रमुखांच्या गाववार बैठका

बचतगटांचे दि. ३१ मार्च ०८ अखेरचे वार्षिक हिशेब संपूर्ण गावातील सदस्यांसमोर मांडणाऱ्या गाववार बैठका एप्रिल व मे मध्ये झाल्या. एकंदरीत ३,२५२ सदस्यांची पुस्तके तपासणी झाली. उपस्थित सदस्यांनी आपापल्या गटांचे हिशेब समजावून घेतले व स्वत:चे पासबुक तपासून घेतले. गट सदस्यांनी अशा प्रकारे हिशोब समजावून घेण्याचा मोठ्या प्रमाणावरचा उपक्रम गावागावांमधून झाला. गट प्रमुखांचा व सदस्यांचा आर्थिक आवाका समजण्याकरिता या बैठकींचा महिलांना उपयोग झाला.

## • बँकांशी संपर्क

महाराष्ट्रभरातील राष्ट्रीयकृत बँकांचे २५ अधिकारी श्रीरामनगरच्या सिद्धांत महिला बचत गटाच्या 'खत गोळ्या' बनविण्याच्या उद्योगास भेट देण्याकरिता आले होते. बचतगटाच्या महिलांनी उद्योजकतेसाठी कर्ज घेऊन केलेल्या कामांची पाहणी करणे व बँकेचा कर्जाचा वापर त्या कोणकोणत्या कारणासाठी करतात ह्याचा अभ्यास करण्यासाठी ते आले होते. रिझर्व्ह बँकेच्या १८ प्रशिक्षणार्थींची शिवापूर व श्रीरामनगर येथील बचतगटांना भेट झाली.

स्वयं सहाय्यता समूह (बचत गट) बँक जोडणी कार्यक्रमाचा राज्य पातळीचा ०७-०८ चा बक्षिस समारंभ दि. १३ फेब्रुवारी ०९ रोजी पुण्यात रिझर्व्ह बँकेच्या कृषी बँकिंग महाविद्यालयामध्ये झाला. त्यात बचत गटामुळे व्यक्तिमत्त्वात झालेल्या बदलात व परिस्थितीत काय फरक पडला याचे अनुभव सांगायला सौ. हिराबाई जोर्वेकर यांना बोलावले होते. बँकांच्या मोठ्या अधिकाऱ्यांसमोर व इतर पुरस्कार विजेत्यांसमोर त्यांनी उत्तम अनुभव कथन केले.

शंभर बचत गट स्थानिक बँकेशी कर्ज घेऊन जोडणी करण्याचा प्रकल्प नाबार्ड सोबत चालू होता. त्यात १०५ गट बँकेशी जोडले गेले व त्यासंबंधीची बैठक शिवापूर येथे दि. १२ फेब्रुवारी रोजी झाली. त्याला युको बँक, सेंट्रल बँक, जनता सहकारी बँक यांचे प्रतिनिधी आले होते.

## • जिजामाता प्रबोधन केंद्र

**अधिकृत नोंदणी** - शिवगंगा-गुंजवणी खोऱ्यातील ४० गावांमधून ग्रामीण महिलांच्या संघटनासाठी गेली १५ वर्षे अनेक उपक्रम आपण करीत आहोत. बचतगटांच्या माध्यमातून विविध विषयांसाठीचे व्यासपीठ उपलब्ध झाले. कौशल्य प्रशिक्षण, उद्योजकता, शेती आणि आरोग्य अशा ४ क्षेत्रांमध्ये या ग्रामीण भागातील महिलांचे संघटन ज्या स्थानिक गटामार्फत होत होते, अशा जिजामाता प्रबोधन केंद्राचे गेल्या महिन्यात अधिकृत नोंदणीकृत संस्था (पब्लिक ट्रस्ट) या नात्याने काम सुरू झाले.

प्रारंभीच्या काळात शिवगंगा खोऱ्यातील ९ गावांमधील २५ महिला या सदर संस्थेच्या सर्वसाधारण सदस्या म्हणजे सभासद असून त्यातील ९ जणींचे कार्यकारी मंडळ निवडले गेले आहे.

दि. १४ जुलै रोजी आषाढी एकादशीच्या दिवशी श्रीरामनगर येथे कार्यकारिणीच्या सदस्यांनी मातृभूमी पूजन केले.

केंद्रामध्ये सावित्रीबाई फुले जयंती निमित्त प्रबोधिनीच्या संघटनेचा प्रतिज्ञा ग्रहणाचा कार्यक्रम झाला. त्यात १ तृतीय, ३ द्वितीय व ९ जणींनी प्रथम प्रतिज्ञा घेतली, ९ जणींनी सामूहिक संकल्प कथन केले तर दोघींनी वैयक्तिक संकल्प कथन केले.

## • कौशल्य प्रशिक्षण व उद्योजकता विकास

खोपी येथे सात जणींचे मोबाईल पर्स शिवणाचे प्रशिक्षण झाले. शिवऱ्याला पणत्या रंगवण्याचे प्रशिक्षण झाले.

वारली चित्रकलेचे (कापडावरचे व मातीच्या भांड्यांवरचे) प्रशिक्षण ११ महिला सदस्यांनी घेतले. मीनाताई लागवणकर यांनी प्रशिक्षक म्हणून काम केले. सुनीताताई गायकवाड यांनी पिशव्यांचे प्रशिक्षण घेतले. या पिशव्या प्रबोधिनी विक्री केंद्रात उपलब्ध आहेत.

दि. २२ डिसेंबर ते २७ जानेवारी या कालावधीत शिवापूर येथे वारली चित्रकला प्रशिक्षण वर्ग झाला. त्यात २७ जणींनी प्रवेश घेतला. हा वर्ग नाबार्डच्या अर्थसाहाय्याने झाला.

स्वयंरोजगार कौशल्य प्रशिक्षणाचे वर्ग काही गावात घेतले. त्यात चटणी, दिवाळीचे पदार्थ, शुभेच्छापत्र बनवणे, शिवण, पर्यटन, ससेपालन असे विविध प्रकारचे वर्ग घेतले. त्यात एकूण ११७ महिलांनी प्रशिक्षणार्थी म्हणून लाभ घेतला.

## • शेती पूरक उपक्रम

खोपी गावातील मुलांनी सुरू केलेल्या ससेपालनाच्या उद्योगास अन्य ४ गावांमधील तरुणांनी भेट दिली.

ज्ञान प्रबोधिनी संशोधन संस्थेच्या वतीने ग्रामीण भागातील महिलांसाठी उद्योजकता प्रशिक्षणे आयोजित केली होती. या वर्गास २५ वर्षांपुढील ९६ ग्रामीण महिला सहभागी झाल्या. सात प्रशिक्षण वर्गांतून या महिलांनी खाद्यपदार्थांच्या उत्पादनाचे (विविध वाळवणे) प्रशिक्षण घेतले.

## • राम-सीता पुराणिक तंत्र निकेतन, शिवापूर

माहे एप्रिल, मे व जून ०८ या कालावधीमध्ये महिला प्रशिक्षण वर्गातील जर्दोसी, ग्लास पेंटिंग व दागिने तयार करणे या वर्गात शिकलेल्या मुलींना प्रमाणपत्र देण्याचा कार्यक्रम दि. १५ जून रोजी झाला. या दिवशी विशेष कार्यक्रम म्हणून मातृभूमी पूजनाची योजना केलेली होती. २५ जणींच्या उपस्थितीत मा. सरिताताई शुक्ल व हर्षाताई यांनी मार्गदर्शन केले.

राम-सीता पुराणिक तंत्रनिकेतनमध्ये चार महिन्यातील वर्गातील मुलींनी शिवण, जर्दोसी, दागिने, काचेवरील चित्रकला, मेंदी इ. वर्ग पूर्ण केले. या वर्गातील सर्व ४५ मुलींना प्रमाणपत्र वितरण व मातृभूमी पूजन कार्यक्रम दि. ५ फेब्रुवारीला झाला.

पुराणिक तंत्रनिकेतनाच्या वतीने शिवगंगा-गुंजवणी खोऱ्यांतील युवक-युवतींसाठी तसेच पुण्यातील ५ झोपडपट्ट्यांमधील काही महिलांसाठी कौशल्य प्रशिक्षण वर्ग चालविले गेले. ०८-०९ या वृत्तान्त वर्षात एकूण ६५९ गरजू व्यक्तींनी या प्रशिक्षणाचा लाभ घेतला.

## • स्वयंरोजगार केंद्र

ग्रामीण भागातील महिलांनी बनविलेल्या उत्पादनांची विक्री प्रबोधिनीच्या वास्तूतील स्वयंरोजगार केंद्राच्या स्टॉलमधून होत असते. दि. १ एप्रिल ०८ ते ३१ मार्च ०९ या कालावधीत या केंद्राद्वारे ४० प्रकारची उत्पादने विकून रु. १,९०,६८७/-ची उलाढाल झाली.

ईशान्य मॉल येथे ३ दिवस, कोहिनूर मंगल कार्यालय येथे रोटरीने आयोजित केलेल्या प्रदर्शनात १ दिवस, HSBC बँक, भांडारकर रोड येथे १ दिवस व बिग बाझार मुंबई येथे ५ दिवस प्रदर्शनात केंद्राने भाग घेतला. एकूण रु. १९,०००/- च्या वस्तूंची विक्री झाली.

भीमथडी यात्रेत आठ गटांनी उत्पादन विक्रीसाठी स्टॉलमध्ये सहभाग घेतला होता. शिवरे, कल्याण, श्रीरामनगर, शिवापूर व प्रबोधिनी कार्यकर्त्या अशा एकूण २० महिलांचा यात सहभाग होता. त्यांनी एकूण रु. ७५,०००/- ची विक्री केली.

नटराज महिला मंडळाची सांगवी येथे कृषी पर्यटन सहल झाली, यामध्ये ३० सदस्यांनी सहभाग घेतला.

मुंबई येथे झालेल्या 'महालक्ष्मी सरस २००९' या बचत गटांच्या उत्पादनांच्या प्रदर्शनात आपण भाग घेतला होता. पिठलं-भाकरी, ताक-भजी, तांदूळ, कला-कौशल्य वस्तू, उन्हाळी उत्पादने अशा वस्तूंची एकूण विक्री रु. १ लाखाची झाली. हे प्रदर्शन दि. २३ जानेवारी ते ३ फेब्रुवारी ०९ पर्यंत होते.

## • ग्रामीण जीवन परिचय सहली

ग्रामविकसन विभागाने बाल शिक्षण मंदिराच्या इ. १०वी च्या ८३ विद्यार्थ्यांची व रेणुका स्वरूपच्या ११४ विद्यार्थिनींची शैक्षणिक सहल सांगवी येथे आयोजित केली होती. त्यात पारंपरिक घरांची रचना, घरगुती उपकरणे (मुसळ, जाते इ.) मापे, शेती अवजारे, सुतार कामासंबंधी अवजारे, कुंभारकाम, सर्पमित्रांकरवी सापांची माहिती, कथाकथन असे कार्यक्रम झाले.

## • किशोरी विकास

### सकस आहार प्रकल्प

दि. ३१ जुलै रोजी वेल्हे तालुक्यातील आंबवणे गावात सरस्वती विद्या मंदिराच्या इ. ८वी तील ६३ विद्यार्थिनींसाठी सकस आहार प्रकल्पाची सुरुवात झाली. कार्यक्रमाच्या पाहुण्या म्हणून मा. हर्षाताई किर्वे उपस्थित होत्या.

प्रकल्पाचा प्रारंभबिंदू म्हणून ५४ विद्यार्थिनींची रक्ताची तपासणी झाली. विद्यार्थिनींचे वजन, उंची इ. तपशील टिपण्यात आले. तसेच प्रज्ञा मानस तज्ज्ञांनी त्यांची आकलनविषयक चाचणी घेतली.

विंझर येथील समकक्ष मुलींचा गट तुलनेसाठी घेतला होता.

दर मंगळवारी आहारतज्ज्ञ वंदनाताई आठल्ये व पूनम मराठे यांनी 'सकस आहारा'विषयी वर्ग घेतले. डॉ. वैशाली बिनीवाले यांनी सकस आहार प्रकल्पातील आंबवणे सरस्वती विद्यामंदिरातील

छात्रांशी 'आहार व त्याचे आरोग्यातील महत्त्व' यावर संवाद साधला.

आपण प्रथम शैक्षणिक सत्रात अडीच महिने व द्वितीय शैक्षणिक सत्रात साडे तीन महिने दर आठवड्यात ४ दिवस असा सकस आहार दिला. त्याचे परिणाम बघण्यासाठी दि. २८ फेब्रुवारी रोजी आंबवणे येथे त्यांची व दि. १७ मार्च रोजी विंझर येथील तुलना गटाच्या मुलींची रक्त तपासणी झाली. प्रतिसादात्मक माहिती भरणे व मानसिक मूल्यमापन करणाऱ्या चाचण्या शेवटी घेण्यात आल्या.

**व्यक्ति विकास प्रकल्प** वेल्हे गावातील घेवंडे, सांगवी व भट्टी या तीन गावांमधील प्रबोधिकांच्या स्थानिक प्रेरणेतून तेथे किशोरींचे गट सुरू झाले.

दि. १७ सप्टेंबर रोजी सांगवीच्या २५ किशोरींचे एक दिवसाचे शिबिर झाले. भट्टी गावातील किशोरींची केळद येथील मढेघाटमध्ये वर्षासहल आयोजित केली होती.

वेल्हे येथील दिघे आळीतल्या मुलींना दिवाळी शुभेच्छापत्रांचे प्रशिक्षण दिले. त्यांनी ३८० शुभेच्छापत्रांचे उत्पादन केले. पारवडी येथे व्यक्तिमत्त्व विकसन शिबिर सुरू झाले. सांगवी येथील २३ जणींसाठी अत्तर बनविण्याचा प्रशिक्षण वर्ग झाला.

केळद व घिसर येथे शाळा सोडलेल्या १८ मुलींसाठी शिवण वर्ग आयोजित करण्यात आला. भट्टी येथे एक मेळावा झाला. या किशोरींनी एका बचत गटाची स्थापना केली. सांगवी येथे पहिला मासिक कार्यक्रम झाला. त्यात बौद्धिक खेळ झाले व मुलींना गळ्यातल्या माळा करायला शिकविले.

दि. २० ते २४ ऑक्टोबर रोजी पारवडी, ता. भोर येथे किशोरी विकास शिबिर झाले. इ. ८ वीच्या मुलींसाठी घेतलेल्या या शिबिरात १२ गावच्या ९३ जणी सहभागी झाल्या होत्या. शिबिर समारोपात संत्रिकेतील श्री. म्हैसकर गुरुजींनी दिलेल्या रु. २०,०००/- च्या देणगीतून घेतलेल्या ६ सायकलींचे वाटप झाले. शाळेत जाण्यासाठी ज्यांना रोज दीड तासापेक्षा जास्त चालावे लागते त्यांना याचे वाटप केले.

रहाटवडे गावात इ.५ वी ते ७ वी मुलींचे दर शनिवारी साप्ताहिक दल घेतले जाते. त्यामध्ये उपासना, खेळ, पद्य व चर्चा इ. गोष्टी घेतल्या जातात. ह्या मुलींसाठी दि. १४ ते १६ एप्रिल रोजी कला कौशल्य प्रशिक्षण शिबिर झाले. त्यामध्ये गिफ्ट वस्तू बॉक्स, भेटकार्ड, मूर्ती तयार करणे, विविध रांगोळ्या (६ प्रकार), पद्य व बर्चीनृत्य इ. शिकविले. मातृभूमी पूजनाच्या कार्यक्रमाने शिबिराची सुरवात झाली. सौ. अश्विनीताई ठाकर यांनी शिबिर घेतले. शिबिरामध्ये ४५ मुली उपस्थित होत्या.

दि. ५ जून रोजी शिवापूर येथे येणाऱ्या वर्गाच्या मुलींना आहाराविषयी माहिती कल्याणीताईने दिली. त्यांच्याशी चर्चा करून झाल्यावर कुसगांव येथे जाऊन लहान मुलांच्या आहारासाठी काही महिलांना एकत्र करून त्यांची नांवनोंदणी केली, ओळख झाली व दि. १२ जून रोजी कुसगांवमध्ये मध्ये मुलांच्या आहारात असणारे नाचणीचे सत्त्व व गव्हाचे सत्त्व कसे करायचे ते शिकविले.

## • ग्रामीण आरोग्य

### आरोग्य सर्वेक्षण

ज्ञान प्रबोधिनी आयुर्विज्ञान न्यासातर्फे वेल्हे तालुक्यातील निवी, घिसर, घेवंडे गावातील ग्रामस्थांचा सर्वंकष आरोग्य सर्वेक्षणाचा प्रकल्प नोव्हेंबर २००७ पासून सुरू आहे. या प्रकल्पांतर्गत घेवंडे गावात आरोग्य शिबिर घेण्यात आले. शिबिरास ६५ जणांची उपस्थिती होती. शिबिरासाठी विविध विषयांतील तज्ज्ञ डॉक्टर उपस्थित होते. प्रकल्पाचा पाठपुराव्याचा भाग म्हणून घिसर गावातील पाच ग्रामस्थांची मोतीबिंदूची शस्त्रक्रिया दीनानाथ रुग्णालयात झाली.

## • शौचालये बांधकाम

या प्रकल्पाअंतर्गत केळद या गावी २५ संडास बांधण्यासाठी प्रत्येकी रु. १,०००/- अर्थसहाय्य १ वर्षासाठी दिले व २ सिमेंटची पोती, १ संडासचे भांडे अशी वस्तुरूप मदत केली. डिसेंबर अखेर १५ संडास ग्रामस्थांनी बांधून पूर्ण केले.

महिलांविषयक कामासाठी माजी विद्यार्थिनी अंजली संती यांनी रु. १०,०००/- तर नाळवट येथे शौचालये बांधण्यासाठी Innerwheel Clubs Pune - Cops Zone 1 यांनी गावात प्रतिनिधी पाठविले व रु. ५,०००/- देणगी दिली.

## • प्रबोधिका प्रशिक्षण

गेले वर्षभर वेल्हे केंद्रामध्ये चालू असलेल्या पासली खोऱ्यातील १२ आरोग्य प्रबोधिकांच्या प्रशिक्षण वर्गाच्या समारोपाचा व प्रशस्ति पत्रके वाटपाचा कार्यक्रम झाला. पुढील प्रशिक्षण लगेच मे महिन्यापासून सुरू झाले. गेले वर्षभर श्रीमती सिंधूताई जोशी यांनी दरमहा १ या प्रमाणे त्यांची १२ प्रशिक्षणे घेतली. माता-बाल संगोपन व सर्वसाधारण आरोग्याचा प्रशिक्षण वर्ग पूर्ण केल्याबद्दल त्यांना कार्यवाह मा. सुभाषराव देशपांडे यांच्या हस्ते प्रशस्तिपत्रके देण्यात आली. याच कार्यक्रमात युवा-ज्योती प्रकल्पातील मुलींना त्यांनी पूर्ण केलेल्या अभ्यासक्रमाबद्दलचे प्रशस्ति पत्रक देण्यात आले.

वेल्हे प्रबोधिका प्रशिक्षण वर्गास डॉ. विद्याताई माणकीकर यांनी दरमहा एकदा यायला सुरुवात केली. पहिले प्रशिक्षण १० जणींचे वेल्हे येथे घेण्यात आले.

वेल्हे येथील अनुभव लक्षात घेऊन आंबवणे येथील प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये नवीन ९ आरोग्य प्रबोधिकांचे प्रशिक्षण डॉ. वैशालीताई बिनीवाले यांनी घेतले.

• **गरोदर माता सल्लासेवा**

आंबवणे येथील प्राथमिक आरोग्य केंद्रांमध्ये पूरक योजना म्हणून प्रबोधिनीच्या तज्ज्ञ डॉक्टर्सकरवी गरोदर मातांची महिन्यात एकदा तपासणी केली जाते. वृत्तान्त वर्षात या उपक्रमाला प्रतिसाद चांगलाच वाढला. ज्ञान प्रबोधिनीच्या डॉक्टर झालेल्या २ माजी विद्यार्थिनींनी आपली तज्ज्ञता उपलब्ध केली. प्रसूती तज्ज्ञ डॉ. वैशालीताई बिनीवाले व त्यांच्या साहाय्यिका तसेच पॅथॉलॉजिस्ट डॉ. संगीताताई कोहली यांच्याकडील तंत्रज्ञ तपासणीसाठी उपस्थित होते. विभागातर्फे गरोदर महिलांना दूध व सकस आहाराचा पौष्टिक लाडू देण्यात आला. हे तपासणी केंद्र दिवसेंदिवस अधिक डोंगराळ भागातील महिलांना अशी सेवा पुरवीत आहे.

'आरोग्यातून समृद्धीकडे'या प्रकल्पाअंतर्गत आंबवणे येथे ५२ महिलांची गर्भारपणासंदर्भातील निःशुल्क तपासणी झाली. या अशा नियमित तपासणींमुळे महिलांचे घरच्या ऐवजी दवाखान्यात बाळंत होण्याचे प्रमाण वाढते आहे, असे लक्षात आले. याचाच भाग म्हणून १६ गावातल्या आरोग्य प्रबोधिकांचे प्रशिक्षण झाले.

• **परिचारिका वर्ग**

स्वरूपवर्धिनी व ज्ञान प्रबोधिनी यांच्या संयुक्त विद्यमाने वेल्हे येथे घरगुती शुश्रुषेचा (होम नर्सिंग) एक वर्षाचा वर्ग सुरू झाला. त्यात २१ जणींनी प्रवेश घेतला आहे.

• **डोळे तपासणी शिबिरे**

ज्ञान प्रबोधिनी मेडिकल ट्रस्टच्या शिरवळ रुग्णालयाच्या मदतीने आपण दर महिन्याच्या दुसऱ्या शनिवारी डोळे तपासणीचे शिबिर घेतो. आंबवणे व कोंढणपूर येथे शिबिर झाले, त्यास अनुक्रमे ३९ व ५७ अशी उपस्थिती होती. दरमहा एकेका गावात असे शिबिर झाले.

बचत गटाच्या महिलांच्या पुढाकाराने सांगवी बु. ता. भोर येथे ११० जणांच्या आणि शिवरे येथे ५५ जणांच्या डोळ्यांची तपासणी केली. त्यापैकी ४ जणींच्या शस्त्रक्रिया शिरवळ येथे पार पडल्या व १५ जणांनी चष्मे खरेदी केली.

वेल्हे खु. येथे ४४ जणांची डोळे तपासणी झाली. त्यातील ३ जणांनी मोतीबिंदूची शस्त्रक्रिया करून घेतली.

पाल या गावी ज्येष्ठ नागरिकांची डोळे तपासणी झाली त्यास ३५ जण आले होते त्यापैकी तीन जणांनी लगेच शस्त्रक्रिया करून घेतली.

**महिलांची हिमोग्लोबिन तपासणी**

धोंडूमामा साठे मेडिकल कॉलेजच्या वतीने हवेली तालुक्यातील कल्याण गावामध्ये महिलांची रक्त तपासणी झाली. १०० महिला उपस्थित होत्या. डॉ. प्रदीप सेठिया व ९ महिला डॉक्टर असे १० डॉक्टर एकावेळेस गावात उपस्थित असण्याचा प्रसंग गावाच्या इतिहासात क्वचितच होता. यावेळेस विविध आजारांवरील औषधे (रु. १,०००/-) गावकऱ्यांना देण्यात आली. या प्रसंगी प्रत्येकीस खजुराची पाकिटे भेट देऊन रक्तातील हिमोग्लोबिनची वाढ होण्यास त्या पदार्थाची उपयुक्तता व आहारातील प्रमाण यावर त्यांच्याशी डॉक्टरांनी चर्चा केली. भात-लावणीचे दिवस असल्याने चिखल्यांवरील औषधही देण्यात आले.

डॉ. सेठिया व पाच विद्यार्थिनींनी केळद येथे रक्त तपासणी व आरोग्य तपासणी शिबिर घेतले. त्यात ९६ जणांची रक्त तपासणी झाली. त्यांचे हिमोग्लोबिनचे प्रमाण सरासरी ९.८ आढळले.

• **व्यक्तिमत्त्व विकसन**

**मनोभावनिक समृद्धी**

दि. २८ फेब्रुवारी ०९ रोजी वा. सुजलताई वाटवे यांची प्रकल्पास भेट झाली. त्यांनी मनोभावनिक समृद्धी प्रकल्पातील महिलांची अंतिम चाचणी घेतली. या प्रकल्पात आरोग्य प्रकल्प - आंबवणे येथील १२ जणी पूर्णवेळ सहभागी होत्या.

आंबवणे येथे प्रज्ञा मानस संशोधिकेच्या वतीने मनोभावनिक समृद्धी प्रकल्प ६ महिने सुरू होता.

• **आयुर्विमा सेवा**

बचत गटातील महिलांना अगदी नाममात्र प्रीमियममध्ये आयुर्विम्याचे संरक्षण मिळते. उर्वरित प्रीमियम शासन भरते. आपल्या गटांमधील सुमारे १,२०० महिलांनी यंदा योजनेचा लाभ घेतला. दोन जणींचा दुर्दैवी मृत्यु याच काळात झाला व त्यांना महत्त्वपूर्ण रक्कम मिळाली. गटाच्या सदस्य महिलांच्या मुलांना शालेय शिक्षणासाठी शिष्यवृत्ती मिळते. त्यात महिलांनी सहभाग घेतला.

• **अन्य संस्थांशी साहचर्य**

इंडियन असोसिएशन फॉर अप्लाईड सायकॉलॉजी यांच्या वतीने औरंगाबाद येथे झालेल्या १३व्या आंतरराष्ट्रीय परिषदेत 'बचत गटांमुळे आलेल्या आर्थिक साक्षरतेमुळे महिला सक्षम कशा झाल्या' या विषयावर सौ. सुवर्णाताई गोखले यांनी निबंध वाचला.

सोस्वा प्रशिक्षण संस्थेने संस्थेच्या कार्यकर्त्यांच्या क्षमता विकासासाठी यवतमाळ व नांदेड येथे कार्यशाळा घेतल्या होत्या. त्यात प्रा. सुवर्णाताई गोखले व सौ. भारतीताई खासबागे प्रशिक्षक म्हणून गेल्या होत्या.

चांदखेड येथे स्त्री शक्ती प्रबोधन गट (ग्रामीण) यांनी महिला विकास संदर्भात प्रशिक्षण घेतले दुसऱ्या महिन्यात याच सदस्यांचे उद्योजकता व व्यक्तिमत्त्व विकसन या विषयांवरील ४ सत्रांचे प्रशिक्षण झाले. सौ. स्नेहाताई नित्सुरे, सौ. पूनमताई साठे यांनी ही सत्रे घेतली. दुसऱ्या संदर्भात होलिस्टिक चाईल्ड डेव्हलपमेंट (इंडिया) यांनी भारतभरातील १२ राज्यांच्या कार्यकर्त्यांचे प्रशिक्षण योजले होते. त्यात

स्वयंरोजगार प्रशिक्षण व Mini-finance venture या विषयावर सौ. सुवर्णा गोखले यांनी हिंदीतून मार्गदर्शन केले.

• **प्रशिक्षणे**

सेंट्रल बँकेच्या कर्मचाऱ्यांसाठी बचतगटाविषयीचे प्रशिक्षण केले. त्यास महाराष्ट्रातील २५ सदस्य उपस्थित होते.

स्वरूपवर्धिनीच्या बचतगट प्रमुखांचे एक दिवसाचे प्रशिक्षण झाले. यात बचतगटांचे हिशेब व नेतृत्व विकसन यावर सत्रे झाली.

पुणे महानगरपालिका व 'दृष्टी' यांनी आयोजित केलेल्या 'स्त्री-केंद्रित अर्थसंकल्प' या कार्यशाळेत प्रा. सुवर्णाताई गोखले यांनी व्याख्यान दिले. त्यास वृत्तपत्रांनीही उत्तम प्रसिद्धी दिली.

• **विभागाला भेटी**

प्रसाद चिकित्सा, ठाणे या संस्थेचे ६३ कार्यकर्ते, प्रतिनिधी प्रबोधिनीच्या बचत गटांचे काम पाहण्यास आले होते.

मुंबईचे उद्योगपती श्री. सेटलवाड व त्यांचे प्रतिनिधी श्री. अनिल शहाणे यांनी दि. २२ जानेवारी ०९ रोजी आपल्या कार्यक्षेत्रास भेट दिली. त्यात सांगवी, आंबवणे, वेल्हे, भट्टी या गावांना त्यांनी भेट दिली. तेथील बचत गट प्रतिनिधी, उद्योजकता वर्गातील विद्यार्थी, रुग्णशुश्रूषा वर्गातील विद्यार्थिनी व आरोग्य प्रबोधिका यांचेशी त्यांनी संवाद साधला.

~~~

## ❀ मा. संचालक डॉ. गिरीशराव बापट यांच्या प्रकाशित झालेल्या पुस्तिका ❀

| | |
|---|---|
| ◈ प्रकट चिंतन १ | सौर १ पौष, शके १९१९ (दि. २१ डिसेंबर १९९७) |
| ◈ प्रकट चिंतन २ | सौर वैशाख १, शके १९२३ (दि. २१ एप्रिल २००१) |
| ◈ जनी जनार्दन ऐसा भाव | सौर पौष २२, शके १९२६ (दि. १२ जानेवारी २००५) |
| ◈ विद्यार्थ्यांच्या अंतरंगाची जडणघडण | सौर वैशाख २१, शके १९२७ (दि. २१ मे २००५) |
| ◈ Emotional and Motivational Development of Intellectually Gifted Students | Sour Agrahayan 28, Saka 1927 (December 19, 2005) |
| ◈ The Emerging Novelty | Sour Shravan 28, Saka 1928 (19 August 2006) |
| ◈ प्रकट चिंतन ३ -राष्ट्रीयत्वाचे पैलू | सौर माघ ११, शके १९२८ (दि. ३१ जानेवारी २००७) |
| ◈ प्रकट चिंतन ४ - समाजाभिमुख उपासना | सौर माघ ६, शके १९२८(प्रजासत्ताक दिन २००७) |
| ◈ रामदास काय म्हणाले ? (दुसरी आवृत्ती) | सौर चैत्र २९, शके १९२९ (दि. १९ एप्रिल २००७) |
| ◈ सारे विचार-प्रवाह आमचेच | सौर श्रावण २८, शके १९२९ (दि. १९ ऑगस्ट २००७) |
| ◈ सर्वसाधारण प्रबोधिनीपण (प्रकट चिंतन ५) | सौर चैत्र १, शके १९३० (दि. २१ मार्च २००८) |
| ◈ संस्थेच्या घटनेतील उद्देश प्रकट चिंतन (प्रकट चिंतन ६) | सौर वैशाख १७, शके १९३० (दि. ७ मे २००८) |
| ◈ प्रबोधकाची प्रेरणा (प्रकट चिंतन ७) | सौर आषाढ १०, शके १९३१ (दि. १ जुलै २००९) |
| ◈ प्रबोधिनीची वैशिष्ट्ये (प्रकट चिंतन ८) | सौर आषाढ १०, शके १९३१ (दि. १ जुलै २००९) |
~~~

# मध्यवर्ती कार्यक्रम

**चौथा खंड प्रकाशन** - सौर २६ श्रावण, शके १९३०, दि. १७ ऑगस्ट २००८ या दिवशी ज्ञान प्रबोधिनीच्या शैक्षणिक कार्याचा गेल्या दोन दशकांचा आढावा घेणारा, 'ज्ञान प्रबोधिनी : एक अभिनव शैक्षणिक प्रयोग - खंड ४' प्रकाशित झाला.

प्राज इंडस्ट्रीज प्रा. लि. चे अध्यक्ष श्री. प्रमोदजी चौधरी यांच्या हस्ते हे प्रकाशन झाले. श्री. चौधरी यांनी त्यांच्या मनोगतात प्रबोधिनीच्या विस्तारणाऱ्या कार्याबद्दल संतोष प्रकट केला. तसेच प्रबोधिनीने अनौपचारिक शिक्षण चळवळीच्या माध्यमातून शिक्षण विषयक चिंतनात व प्रतिमानांमध्ये (Models) भर घालावी, अशी अपेक्षा व्यक्त केली.

विवेकानंद केंद्र, कन्याकुमारी च्या उपाध्यक्षा व ज्येष्ठ कार्यकर्त्या मा. निवेदितादीदी भिडे यांचे या प्रसंगी प्रमुख व्याख्यान झाले. मा. निवेदितादीदी भिडे यांनी आपल्या व्याख्यानातून 'भारतीयत्वाच्या अंतरंगातील पैलू'विषयी चर्चा केली. हिंदुस्थानातील परंपरांची व लोकज्ञानाची जाण शिक्षणातून निर्माण होण्याची गरज त्यांनी व्यक्त केली.

~~~

# सीमावर्ती प्रांतांमधील काम

## काश्मिरमधील प्रश्नमंजूषा स्पर्धा

काश्मिरमध्ये 'विज्ञान व चालू घडामोडी' या विषयावर प्रश्नमंजूषा स्पर्धा आयोजित केली होती. यामध्ये बिजबिहारा, कुपवाडा, मिश्रीवाला, मुथीकॅम्प, ब्रामरी, वालची व हुंडवारा या गावांमधील साधारण १३ ते १५ शाळांनी सहभाग घेतला होता. या निमित्ताने १०० विद्यार्थ्यांपर्यंत पोचता आले. ही स्पर्धा जिल्हापातळी व राज्यपातळी अशा दोन भागांमध्ये घेतली गेली.जिल्हापातळीवरील स्पर्धेची सर्व तयारी जम्मू-काश्मिरमधील कार्यकर्त्यांनी केली होती व स्पर्धा उत्तमरित्या पार पडली. राज्यपातळीवरील स्पर्धा 'टेलिकॉन्फरन्सिंग' द्वारा घेतली गेली. अशा पद्धतीने पहिल्यांदाच ही स्पर्धा आयोजित केली होती व यशस्वीरित्या पार पडली. बिजबिहारा येथील केंब्रिज हायस्कूलला पहिले पारितोषिक मिळाले.

**जम्मूतील युवकांचे प्रतिज्ञाग्रहण** - जम्मूतील विद्यार्थ्यांच्या महाराष्ट्र दौऱ्यात तेथील एका युवकानेही पुण्यात असताना प्रथम प्रतिज्ञा घेतली.

## खरसांग, अरुणाचल प्रदेश -अध्यापक शिबिर

विवेकानंद केंद्राच्या आसाम व अरुणाचल प्रदेश येथील १८ शाळांमधील सामाजिक विज्ञान विषयाच्या अध्यापकांसाठी विवेकानंद केन्द्र विद्यालय, खरसांग, अरुणाचल प्रदेश येथे दि. १२ ते १५ ऑक्टोबर या कालावधीत ५० अध्यापकांचे प्रशिक्षण शिबिर झाले. शिबिरात भूगोल, इतिहास, राज्यशास्त्राचे अध्यापन करण्यासाठी संकल्पना अध्यापन, तंत्रज्ञानाचा वापर, परिसर सहली आदी विषयांबाबत प्रशिक्षण सत्रे होती. आपदा प्रबंधन या विषयाच्या प्रशिक्षणासाठी अध्यापकांनी शालेय परिसराचा आपदा प्रबंधक आराखडा तयार केला. अरुणाचल प्रदेशातील जैवविविधता व भौगोलिक वैशिष्टये पाहण्यासाठी शिबिरात परिसर सहलीचे आयोजन केले होते. डॉ. सुरेंद्र ठाकुरदेसाई व प्रा. प्रशांत दिवेकर यांनी या शिबिरात मार्गदर्शन केले.

## पुण्यात आसामी शिक्षकांचे शिबिर

आसाम व अरुणाचल प्रदेशात विवेकानन्द केन्द्रामार्फत चालविल्या जाणाऱ्या शाळांतील अध्यापकांसाठी दि. २० ते २६ मे या कालावधीत प्रशिक्षण शिबिर आयोजित केले होते. शिबिरात गणित व विज्ञानाचे अध्यापक सहभागी झाले होते. विविध वैज्ञानिक तत्त्वांवर आधारित प्रयोग व खेळणी तयार करणे हा शिबिराचा उद्देश होता. सहज उपलब्ध साहित्यातून वैज्ञानिक तत्त्वे समजावून सांगता येतील अशा प्रयोगांच्या रचना अध्यापकांनी तयार केल्या. पुणे परिसरातील आयुका, पुणे विद्यापीठ, विज्ञानाश्रमसारख्या विविध शैक्षणिक संस्थांना भेटी देऊन तेथील शैक्षणिक प्रयोगांची माहिती करून घेतली. ज्ञान प्रबोधिनीतील विविध शैक्षणिक उपक्रमांचे संयोजक तसेच पुण्यातील डॉ. संजीव नलावडे, प्रा. उल्हास टुमणे, डॉ. राजेंद्र देवपूरकर अशा उपक्रमशील अध्यापकांबरोबर गप्पा-चर्चासत्रे आयोजित केली होती.

~~~

### ज्ञान प्रबोधिनीचा वास्तुविस्तार प्रकल्प

ज्ञान प्रबोधिनीची स्थापना पुण्यात ५१४ सदाशिव पेठ, पुणे ३० येथील परांडे वाड्यात झाली होती. कालांतराने ही वास्तू ज्ञान प्रबोधिनीच्या मालकीची झाली. या जागची जुनी दगडी इमारत उतरवून नवी पाच मजली वास्तू बांधण्याचा विस्तार प्रकल्प आखला आहे. विविध संशोधिका, प्रशिक्षण केंद्रे आणि सहनिवास यांची व्यवस्था या इमारतीत होणार आहे. सुमारे २२,५०० चौ. फुटांच्या बांधकामास रु. ३ कोटी एवढा खर्च अपेक्षित आहे. हितचिंतकांना देणगीसाठी आवाहन !

# ज्ञान प्रबोधिनीचे सन्माननीय देणगीदार
## (२००८ - ०९)

**(सर्व देणगीदारांबद्दल कृतज्ञता आहे. येथे उल्लेख रु. १,०००/- च्या पुढच्या देणग्यांचा केला आहे.)**

★ रु. ५००/- पर्यंतच्या देणग्यांची एकूण वार्षिक रक्कम ४,३९८/-

★ रु. १,००० /- प्रत्येकी, असे ३४ देणगीदार : एकूण रक्कम ३४,०००/-

**★ रु. १००१/- प्रत्येकी**

१) निंबाळकर आर. एन्.
२) अभ्यंकर वसंत
३) बापट मिलिंद
४) राजहंस प्रिया
५) राजगुरु सुधा
६) लेले ओजस
७) उपासनी हृषीकेश
८) पटवर्धन शकुंतला
९) गाडगीळ शुभांजली
१०) डोंगरे शकुंतला १,००५/-
११) फाटक प्रकाश १,०३०/-
१२) कुलकर्णी वसंत १,१११/-
१३) अभ्यंकर जयंत १,१२१/-
१४) चावरे राजश्री १,२००/-
१५) राधारामानन विजय १,२०२/-
१६) अनामिक १,२५०/-
१७) गुरुदक्षिणा १,३५१/-
१८) साठे पूनम १,५००/-
१९) वेंगुर्लेकर उमा १,५००/-
२०) विद्या विकास विद्यालय १,५००/-
२१) पुसाळकर राजीव १,५०१/-
२२) सौ. प्रभा करंदीकर सार्व. न्यास १,५०१/-
२३) भालेराव मुकुंद १,५०१/-

**★ रु. २०००/- प्रत्येकी**

१) सोनी सारीका
२) गो. ल. सहस्रबुद्धे पब्लिक ट्रस्ट
३) नेहरु तरुण मंडळ ट्रस्ट
४) काकडे संतोष
५) चावरे समीर
६) सोहोनी रजनी
७) कात्रे संध्या
८) कात्रे रामचंद्र
९) चावरे संजय
१०) चावरे स्मिता
११) पेठे प्रमोद
१२) हर्षे विश्वास
१३) बाखले वर्षा
१४) पाटील दत्ता
१५) कोतवाल शशांक
१६) जांभेकर सोनल
१७) उमा इंजिनिअर्स
१८) कुलकर्णी श्रीपाद
२०) सुयश चॅरिटेबल ट्रस्ट २,००२/-
२१) मेघावी इंजिनिअर्स प्रा. लि. २,००२/-
२२) अहीरराव प्रफुल्ल २,१००/-
२३) चुटके विनय २,१६०/-

**★ रु. २,५००/- प्रत्येकी**

१) साठे प्रद्युम्न
२) गुजराथी भूषण
३) वाळिंबे केदार
४) रानडे आमोद
५) सोमण शार्दुल
६) महागांवकर कमलाकर
७) जोशी श्रीकांत
८) खरे विमल
९) कोटीभास्कर प्राजक्ता
१०) साने नागेश
११) देशमुख अनिता
१२) सहस्रबुद्धे प्रथमेश
१३) वराडपांडे योगेश
१४) सहस्रबुद्धे सचिन
१५) कुलकर्णी योगेश
१६) परांजपे उमा
१७) कर्वे उदय
१८) सुळे अस्मिता
१९) परांजपे जुई
२०) महाडणे पंकज
२१) निकम विजय
२२) लिमये अभय

**★ रु. ३,०००/- प्रत्येकी**

१) ओक चॅरिटेबल ट्रस्ट
२) गोगटे शालिनी
३) लांजेकर मनिष
४) गोखले सुवर्णा ३,७५०/-
५) जोशी जान्हवी ३,८००/-

★ रु. ४,०००/- प्रत्येकी

१) शेटे अजित
२) निवासराकर
३) इंद्रनगरी
४) प्रेम नगर मित्र मंडळ
५) मित्र मंडळ को-ऑप हौ. सो.
६) पंडित योगेश
७) शिखरे मधुराणी
८) लिमये अभिजीत
९) पटवर्धन अजित
१०) पोंक्षे बागेश्री
११) बडवे इंजिनिअर्स
१२) नासेरी कल्याणी
१३) लक्ष्मीनारायण संस्था
१४) मराठे श्रीकृष्ण
१५) आपटे किर्ती
१६) गणेश मंडळ प्रमुख ४,५००/-
१७) गोरे सतिशचंद्र ४,५००/-

★ रु. ५,०००/- प्रत्येकी

१) कुलकर्णी प्राची
२) टोळ अभया
३) वझे मंदार
४) भालेराव राजीव
५) बर्वे अमोल
६) एकता मित्र मंडळ
७) कुकडे अशोकराव
८) भिडे प्रसाद
९) भिडे दिवाकर
१०) सदाशिव पेठ मित्र मंडळ
११) पाटणकर सारंग
१२) भावे सदाशिव
१३) गुर्जर नरेंद्र
१४) कामठे विक्रम
१५) कुंटे रेणू
१६) इनरव्हील क्लब
१७) माखिजा अनुपम
१८) नवरे हेमंत
१९) दगडूशेट हलवाई ट्रस्ट
२०) कश्यप विकास
२१) पाटील गोपाल
२२) खांबाटे मकरंद
२३) रामभाऊ भिडे चॅरीटेबल ट्रस्ट
२४) जोशी यशवंत
२५) अष्टेकर राघवजी
२६) हिरवे हेमंत
२७) सहस्रबुद्धे गौरव
२८) भावे कुंदा ५,००१/-
२९) रेळेकर मोहन ५,००१/-
३०) गजेंद्रगडकर रविंद्र ५,००१/-
३१) बापट अरुण ५,००१/-
३२) अराध्ये सुनिल ५,००१/-
३३) लिमये सुधीर ५,००१/-
३४) हिरवे अच्युत ५,००१/-
३५) जोशी देवेंद्र ५,००१/-
३६) महाजन शंतनू ५,०२५/-
३७) ग्राहक पेठ मित्र मंडळ ५,५००/-

★ रु. ६,०००/- प्रत्येकी

१) आकुट अदिती
२) सनसिटी मंडळ
३) केपीआयटी कमिन्स इन्फोसिस लि.
४) साईनाथ मित्र मंडळ
५) भट
६) पर्वती सेवा मंडळ
७) गजानन मित्र मंडळ
८) गुर्जर अनिता
९) ज्ञा. प्र. नवनगर विद्यालय
१०) परांजपे अमर

★ रु. ७,०००/- प्रत्येकी

१) गुरुवार क्लब गणेश तरुण मंडळ
२) आझाद हिंद मित्र मंडळ
३) अखिल भेलके नगर मित्र मंडळ
४) मावळणकर चारुलता
५) देवगांवकर आरती
६) एकता मित्र मंडळ

★ रु. ८,०००/- प्रत्येकी

१) देसुरकर विनायक
२) नेहरु तरुण मंडळ ट्रस्ट
३) परांजपे मंगेश

★ रु. १०,०००/- प्रत्येकी

१) संयुक्त प्रसाद मित्र मंडळ
२) दाते विजया
३) अमर मित्र मंडळ
४) किर्वे हर्षा
५) आझाद हिंद मित्र मंडळ
६) बिवलकर शशांक
७) जोशी विजया
८) पिंप्रीकर अरविंद
९) पाटणकर संजय
१०) मोने सुधा
११) नाईक माधवी
१२) आवटे योगेश
१३) कै. श्री. एम्. जी. कोटीभास्कर ट्रस्ट
१४) देवगांवकर मंदार
१५) सन्ती अंजली
१६) अनामिक
१७) सोहोनी कौस्तुभ
१८) आठवले स्मिता
१९) कुलकर्णी एम्. जी.
२०) चांदोरकर शशांक
२१) माने प्रशांत
२२) कामठे विक्रम

२३) नांगरे राहुल २४) आवटे किरण २५) आवटे रवि २६) गाडगीळ अमित
२७) पटवर्धन वनिता २८) पंडीत अनघा २९) डोंबिवली नागरी सह. बँक लि.
३०) गोखले केतन १०,००१/- ३१) बापट अजित ११,०००/- ३२) अचानक मित्र मंडळ ११,०००/-
३३) महाजन कुसूम ११,०००/- ३४) एदलाबादकर अतुल ११,०००/- ३५) घैसास अमित ११,०००/-
३६) जय श्रीराम तरुण मंडळ १२,०००/- ३७) अखिल भेलके नगर मित्र मंडळ १४,०००/-
३८) संगवी विभागी मित्र मंडळ १४,०००/- ३९) द्वारका स्मृती सार्व. विश्‍वस्त संस्था १५,०००/-
४०) कुलकर्णी मंदार १७,५००/- ४१) साईनाथ मंडळ ट्रस्ट १८,०००/-

★ **रु. २०,०००/- प्रत्येकी**

१) जोशी एन्. सी. २) इनामदार मृदुला २१,०००/- ३) बाळ शैलजा २१,०००/-
४) देशपांडे दिनेश २१,०००/- ५) केसरकर कल्याणी २४,०००/-

★ **रु. २५,०००/- प्रत्येकी**

१) घैसास अमित २) कुंटे रेणू ३) गंगोत्री स्थापत्य ३) हरके मयूर
४) जोशी विभास ५) परांजपे अजय ६) भावे शशीधर ७) लेले आनंद २७,९५०/-

★ **रु. ३०,०००/- प्रत्येकी**

१) गणपती पंचायतन संस्थान २) खेर अभय ३) पुष्पक एलिव्हेटर्स ३३,०००/-
४) पटवर्धन मिलिंद ३५,०००/- ५) डाटा फिक्स टेक्नोलॉजिस प्रा. लि. ३५,०००/- ६) कानिटकर चिन्मय ३५,०००/-

★ **रु. ४०,०००/- प्रत्येकी**

७) बारमुख आशुतोष ८) लोणकर श्रीधर ६) गंधे योगेश्वर
७) जोग अभिषेक ८) जोशी अद्वय ९) रानडे अनंतभूषण

★ **रु. ५०,०००/- प्रत्येकी**

१) वझे गिरीश २) संत मिलिंद ३) भडकमकर मंगला
४) पर्सिस्टंट सिस्टीमस् लि. ५) पटवर्धन मिलिंद

★ **रु. ५०,०००/- च्या पुढील**

१) परांजपे उदय ५१,०००/- २) गाडगीळ सचिन ५५,०००/- ३) जोशी प्रशांत ६५,०००/-

★ **रु. १,००,०००/- व त्यापुढील**

१) दांडेकर डब्लू. एन्. १,००,०००/- २) केळकर भूषण १,११,१११/-
३) नातू फौंडेशन चॅरिटेबल ट्रस्ट १,६०,०००/- ४) जोशी शुभलक्ष्मी ५,००,०००/-

---

## ☆ ज्ञान प्रबोधिनी, पुणे वास्तुविस्तार ☆

***शैक्षणिक साधन व प्रशिक्षण केंद्र** - शैक्षणिक संस्थांना आवश्यक असणाऱ्या अनेक शैक्षणिक साधनांची निर्मिती व संग्रह करणारे एक केंद्र विकसित करावयाचे आहे.*

*ज्ञान प्रबोधिनीच्या शैक्षणिक कार्याला प्रतिवर्षी शेकडो शिक्षक, मुख्याध्यापक व संस्थाचालक भेट देत असतात. विविध संस्थांतील शिक्षक-मुख्याध्यापकांना नव्या विचार सूत्राचे प्रशिक्षण देण्याचे काम या केंद्रामार्फत होईल.*

***स्पर्धा परीक्षा केंद्र** - राष्ट्रीय व राज्य पातळीवरील प्रशासकीय सेवांमध्ये कार्यकर्ता वृत्तीने काम करणारे कार्यक्षम अधिकारी निवडले जावेत, यासाठी एक तपाहून अधिक काळ प्रबोधिनीचे हे केंद्र यशस्वीपणे काम करीत आहे. त्यासाठी अभ्यासिका व ग्रंथालय, निवासी शिबिर व्यवस्था यांची वाढ नियोजित आहे.*

***बुद्धिमत्ता संवर्धन केंद्र** - ज्ञान प्रबोधिनीतील शिक्षण पद्धतीचा लाभ प्रबोधिनीच्या औपचारिक शाळांच्या पलिकडे समाजातील सर्व स्तरांतील विद्यार्थ्यांना (आदिवासी, ग्रामीण व नागरवस्त्या) व्हावा यासाठी शिबिरे, प्रशिक्षण वर्ग, अभ्यास दौरे, छात्र प्रबोधन - युवा प्रबोधन यासारखी नियतकालिके इ. उपक्रमांचे आयोजन करण्यासाठी अधिष्ठान योजले आहे.*

***संशोधिका** - ज्ञान प्रबोधिनीचे सर्वच शैक्षणिक कार्य संशोधनाधिष्ठित आहे. मानसशास्त्र, शिक्षणशास्त्र व समाजशास्त्र यातील संशोधनासाठी आवश्यक पायाभूत सुविधांची गरज वाढते आहे. या संशोधनाच्या आधारे तयार झालेल्या प्रशिक्षण कार्यक्रमांचा विस्तार होताना दिसतो आहे. यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाने सुसज्ज व्यवस्थांची उभारणी भावी काळात करण्याचे ठरविले आहे.*

★ ***या विस्तारासाठी सध्याच्या वास्तूशेजारच्या जागेत सुमारे २२,५०० चौरसफूट क्षेत्रफळाच्या नवीन वास्तूचीउभारणी सुमारे रु. ३ कोटी खर्चून करावयाची आहे.***

## आवाहन

❖ आपण स्वतः व आपल्या परिचितांमार्फत देणगी.

❖ बांधकाम साहितय, नवे फर्निचर इ. रुपात वस्तुरूप देणगी

❖ ज्या देणगीदारांना आपल्या आप्तांच्या स्मरणार्थ देणग्या द्यायच्या आहेत त्यांच्यासाठी वास्तूतील विविध कक्षांना नावे देण्याची सोय आहे. त्याचे तपशील पुढील प्रमाणे -

१. रु. ५,०००/- पेक्षा अधिक देणगी देणाऱ्यांचा कृतज्ञतापूर्वक उल्लेख वास्तुपूर्ती विशेषांकात केला जाईल.

२. रु. १ लाखापेक्षा अधिक देणगी देणाऱ्यांचा कृतज्ञतापूर्वक उल्लेख नामफलकावर दर्शनी भागात केला जाईल.

3. रु. १० लक्ष देणगी दिलेल्या देणगीदारांचा नामफलक संशोधन कक्ष वा त्या स्वरूपाच्या कक्षावर लावण्यात येईल.

४. रु. २५ लक्ष देणगी दिलेल्या देणगीदारांचा नामफलक संशोधन कक्ष वा त्या स्वरूपाच्या कक्षांवर लावण्यात येईल.

५. रु. ५० लक्ष वा अधिक देणगी दिलेल्या देणगीदाराचे नाव निवासी मजल्यास देण्यात येईल.

❖ देणग्या आयकर कायद्याच्या ८०(जी) कलमान्वये करसवलतीस पात्र आहेत. धनादेश 'ज्ञान प्रबोधिनी' या नावाने काढावा.

❖ उद्योग व्यवसायांच्या उत्पन्नातून (bussiness Income) दिल्या जाणाऱ्या संशोधन देणग्या आयकर कायद्याच्या 35(i)(iii) कलमान्वये करसवलतीस पात्र आहेत. धनादेश ''ज्ञान प्रबोधिनी संशोधन संस्था'' या नावाने काढावा.